क्रान्तिवीर

वासुदेव बळवन्त

(तीन अंकी संगीत नाटक)

: लेखक :

गणेश कृष्ण बोडस

[झांशीची राणी, धर्मवीर संभाजी, भगवा झेंडा, मर्द मराठा, अटकेपार, वीर नेताजी, पूज्य गांधीजी, स्वातंत्र्ययज्ञ, वाहव्वारे विद्वान इ. नाटकांचे कर्ते]

प्रकाशन क्रमांक : ४१

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

आवृत्ति पहिली
१९५१
आवृत्ति दुसरी
जानेवारी १९५१

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे
प्रोप्रायटर
श्री ज्ञानेश्वर प्रेस
३९३ सी, शिवाजी रोड
कोल्हापूर.

पात्र—परिचय

वासुदेव बळवंत	आद्य महाराष्ट्रीय क्रांतिकारक
विसाजी	एक राजनिष्ठ सावकार
विनायक	सावकारपुत्र
रामा	सावकार—सेवक
मेजर डॅनिअल	पोलिस सुपरिन्टेन्डेंट
सय्यद अबदुल हक	हैद्राबादचा पोलिस कमिशनर
सावित्री	स्वातंत्र्यवादी सावकारकन्या
सीता	एक रंडकी स्त्री
गुणाजी	एक शेतकरी

याशिवाय

[illegible], खौल्या, चवल्या, पावल्या, इ.
[illegible] व कांहीं सोलजर वगैरे

स्थळ : अवघा महाराष्ट्र काळ : इ. स. १८७९

महत्त्वाची जाणीव

'वासुदेव बळवंत' या नाटकाचा प्रयोग कोणत्याही कारणासाठीं करण्यापूर्वी आवश्यक तें मानमूल्य देअून लेखकाची संमति घेणें आवश्यक आहे. न घेतल्यास नैर्बंधिक अिलाज केला जाअील.

पत्ता : गणेश कृष्ण बोडस,
श्रीराम मन्दिर, सिरी रस्ता, मुंबअी ६

पूर्वपीठिका !

तें बहुधा इ. स. १९०९ किंवा १० साल असेल! आमच्या श्री माणिक-प्रभू सं. मंडळीचा मुक्काम त्यावेळीं बार्शी येथें होता. त्यावेळीं तेथील गोरक्षण संस्थेंत, क्रांतिवीर वासुदेव बळवंत यांचे सहकारी दे. भ. कृष्णाजी आबाजी गुरुजी या नांवाचे एक भव्य विरागी पुरुष राहात असत. ते मधुन मधुन आमच्या नाट्यप्रयोगास येत असत. त्यांच्याविषयीं आम्हांला औत्सुक्य व आदर वाटत असल्यामुळें आम्ही रोज सायंकाळीं त्यांच्याकडे जात असूं! त्यांचे तोंडून प्रख्यात क्रांतिकारक 'वासुदेव बळवंत' यांच्या-संबंधीं बऱ्याच रोमहर्षक आणि आमच्या तरुण मनाला स्फूर्ति देणाऱ्या गोष्टी आम्हांस ऐकावयास मिळाल्या. प्रस्तुत नाटकाचें बीजारोपण त्यावेळीं झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्यानंतर आमचे ९० वर्षांचे मामा ती. वे. शा. सं. रामभटजी देवधर यांचेकडूनही वासुदेव बळवंताविषयीं अनेक चित्तवेधक गोष्टी समजल्या. तेव्हांपासून या थोर देशभक्ताच्या अपूर्व जीवनचरित्रावर एक नाटक लिहावें असा मीं संकल्प केला. पण संकल्प आणि सिद्धि यांत ईश्वरी इच्छा उभी असल्याकारणानें तो संकल्प आजतागायत सिद्धीस जाऊं शकला नव्हता.

त्यावेळीं अवघा हिंदुस्थान इंग्रजांच्या जुलमी राजवटीनें बेभान बनून गेला होता. राजकीय असंतोषाच्या ज्वालामुखीच्या स्फोटानें सर्व वातावरण त्यावेळीं कमालीचें तापून गेलें होतें! आणि साऱ्या देशभर ठिकठिकाणीं इंग्रज अधिकाऱ्यांच्या खुनाचे कट रचले जात होते व ते शिताफीनें पार पाडले जात होते. अर्थात् सरकारकडूनही धरपकड, झडत्या, खटले यांचें सत्र जोरांत सुरू होतें. आणि भारतीय पुनरुत्थानासाठीं साहसी मार्ग पत्करलेल्या अनेक तरुणांना, काळ्या पाण्यावर पाठवण्याचा अगर फांसावर चढवण्याचा जुलमी नोकरशाहीनें धूमधडाका चालवला होता. 'जो लोककल्याण साधावया जाण' या शारदा नाटकांतील साध्या व सरळ अर्थाच्या पदावरसुद्धां जिथें बंदी घालण्यांत आली, तिथें एका क्रांति-कारकाच्या जीवनचरित्रावरील नाटकास सरकारी परवानगी मिळणें सर्वस्वीं अशक्य असल्यामुळें माझी नाट्यलेखनाची मनीषा कांहीं काळ अतृप्तच राहिली.

तथापि इ. स. १९३१ सालीं, स्वराज्यसंस्थापक व स्वधर्मसंरक्षक श्री शिवाजी महाराजांच्या चरित्रावर मीं माझें पहिलें नाटक '**स्वातंत्र्य यज्ञ**' लिहिलें. त्यानंतर इ. स. १८५७ च्या क्रांतियुद्धांतली समरदेवता झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांच्या रोमांचकारी चरित्रावर मी '**शूर लक्ष्मीबाई**' या नांवाचें संगीत नाटक लिहून आमच्या 'सुंदर संगीत मंडळी'कडून त्याचे सतत दहा वर्षे अखिल महाराष्ट्रांत अनेक प्रयोग केले. पुढें, देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या आदर्श चरित्रावर '**वीर नेताजी**' या नांवाचें नाटक लिहिलें, आणि आतां स्वतंत्र भारताच्या निरंकुश वातावरणांत, सुमारें ७५ वर्षांपूर्वींच इंग्रजांना 'चले जाव' म्हणून छातीठोकपणें सांगणाऱ्या आणि सशस्त्र क्रांतीचा झेंडा फडकवणाऱ्या महाराष्ट्रवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या, तरुणांच्या चित्तवृत्ती थरारून सोडणाऱ्या, साहसी व स्फूर्तिदायक जीवनचरित्रावर आधारलेलें हें नवीन नाटक मी महाराष्ट्र-रसिकांना सादर करीत आहें.

या नाट्यलेखनाचे कामीं ज्या ज्या ज्ञात वा अज्ञात व्यक्तींचें, तसेंच साहित्यिकांचें मला बहुमोल साहाय्य झालें त्या सर्वांचा मी ऋणकरी आहें!

त्याचप्रमाणें नेहमीं तेजस्वी व स्फूर्तिदायक साहित्य वाचकांना सादर करणारे, श्री. गजाननराव परचुरे यांनीं या रोमांचकारी नाटकाच्या प्रकाशनाची जबाबदारी हौसेनें पत्करल्याबद्दल त्यांचा, आणि सुबक छपाईच्या-बाबतींत ख्यातनाम असलेल्या सुप्रसिद्ध 'मौज प्रिंटिंग ब्यूरो' या मुंबईतील मुद्रण संस्थेनें, सदर पुस्तकाच्या छपाईचें काम अल्प मुदतींत व सुव्यवस्थित करून दिल्याबद्दल, 'मौज प्रिंटिंग ब्यूरो'चे चालकांचा मी आभारी आहें.

मकर संक्रांति
१४।१।५१ मुंबई

नम्र नाट्यलेखक
गणेश कृष्ण बोडस

१

प्रवेश पहिला

[**स्थळ**—पळस्पे येथील **विसाजीपंत** सावकारांचा वाडा. गादीलोडाची बैठक. पानदान व कांहीं हिशेबाच्या वह्या ठेवलेल्या आहेत. भिंतीवर त्यांच्या पूर्वजांच्या एकदोन तसबिरी असून, मध्यभागीं महाराणी व्हिक्टोरियाची भव्य तसबीर टांगलेली आहे. सुमारें ५५ वर्षांचे **विसाजीपंत** अंगांत कुडतं, त्यावर गरम बंडी, कानटोपी व आखुड धोतर अशा पोशाखांत प्रवेश करतात.]

विसाजी : " प्रात:काले शिवं दृष्ट्वा निशीपापं विनश्यति । आजन्म-कृतं माध्यान्हे सायान्हे सप्तजन्मनि " (असं म्हणून पूर्वजांच्या तसबिरींना व महाराणी व्हिक्टोरियाच्या तसबिरीस नमस्कार करतात. पण तसबिरीस हार घातलेला नाहीं असं पाहून चपापून मागं सरतात) पण हें काय ? महाराणी-साहेबांच्या गळ्यांत नित्याप्रमाणं पुष्पहार कां नाहीं ? हे नोकरलोक आजकाल मोठे हरामखोर झाले आहेत. रामा, ए राम्या, इकडे ये पाहूं. (रामा गडी येतो.)

रामा : काय धनीसाहेब ?

विसाजी : काय रे हरामखोरा ? तुम्ही कामं करतां कीं काय करतां ?

रामा : माझं काम चोख असतं धनीसाहेब. पगाराची बाकी तुंबली तरी माझ्याकडून कामाची कुचराई व्हायची नाहीं कधीं.

विसाजी : लांब जीभ काढून बोलायला शरम नाहीं वाटत ?

रामा : (स्वगत) नोकराला शरम असते हें मी आजच ऐकतोय.

विसाजी : तोंडांतल्या तोंडांत काय पुटपुटतोस ? आज बागेंतलीं फुलं काढलींस का ? का भुंग्यांनीं मधाबरोबर फुलंही फस्त केलीं ?

रामा : छे छे धनीसाहेब. आपल्या फुलांमधें मधच नसतो. मग भुंगे कशाला मरायला येतील बागेंत ?

विसाजी : मग फुलं आहेत कुठं ! घरांत दिलींस, का तुझ्या बापाच्या तिरडीवर वहायला नेलींस ?

रामा : नेहमींप्रमाणें फुलं काढून तीं घरांत ताईसाहेबांच्यापाशीं दिलीं.

विसाजी : राम्या, जा आधीं सावित्रीला बोलावून आण इकडे. (रामा जातो.) घरांतल्या नोकराप्रमाणेंच पोरीही कामचुकार झाल्या आहेत. (तसबिरीला हात जोडून) मातोश्री, या लेकरावर रागावूं नका. पोरीच्या चुकीमुळं आज आपल्या गळ्यांत अजून हार पडला नाहीं. आपल्या पूजेंत आगळीक झाली त्याबद्दल या दासानुदासाला क्षमा करा. (**सावित्री** व रामा येतात.)

सावित्री : बाबा, मला कशाला बोलावलंत ?

विसाजी : सावित्री, यानं तुझ्याजवळ फुलं आणून दिलीं ना ?

सावित्री : हो दिलीं.

रामा : बघा धनीसाहेब. माझी नोकरी चोख असते. पगार नाहीं मिळाला तरी कामांत कुचराई होणार नाहीं कधीं !

विसाजी : चूप राहा. चोमडेपणा करशील तर लाथा खाशील. मग काय ग पोरी, त्या फुलांचं काय केलंस ?

सावित्री : हार केला.

विसाजी : मग, महाराणीसाहेबांच्या तसबिरीला तो अजून कां नाहीं घातलास ? सायंकाळचा नित्यक्रम कां मोडलास ?

सावित्री : बाबा, आज किनई फुलं फारच थोडीं होतीं. त्यांचा अवघा एकच हार झाला. तो मीं देवघरांतल्या माझ्या आईच्या तसबिरीला घातला.

विसाजी : पण कार्टे, ही आपणां सर्वांची आई, आज हारावांचून राहिली त्याची काय वाट ? तुझी आई मेली गेली तिचं सोनं झालं ! पण या आईसाहेब कोपल्या तर आमची सावकारी कशी चालणार ? या आईची कृपा आहे, म्हणूनच आमचं सोनंनाणं व जडजवाहिर सुरक्षित आहे.

नाहींतर त्या वासुदेव बळवंतानं, इतर सावकारांप्रमाणं आम्हांलाही नंगाफकीर करून सोडलं असतं !

सावित्री : बाबा, गोरगरिबांना नाडून पुष्ट बनलेल्या दुष्ट सावकारांनाच तो लुटतो. सचोटीच्या शहाजोग सावकारांच्या तो केंसालाही धक्का लावीत नाहीं.

रामा : खरं आहे ताईसाहेब. तो फारच सज्जन पुरुष आहे म्हणतात.

विसाजी : तो फार सज्जन पुरुष आहे; आणि आम्ही काय बदमाष आहोंत ?

रामा : (स्वगत) तें सर्व गांवाला माहीत आहे.

विसाजी : एवढा चांगला शिकलेला, थोर कुळांत जन्माला आलेला, राजनिष्ठ बळवंतराव फडक्यांचा मुलगा. पण सरकारी नोकरी सोडून भिल्ल रामोशांच्या टोळीचा नायक बनला आहे ! सूर्यापोटीं शनैश्वर म्हणतात त्याप्रमाणें राजनिष्ठ बापापोटीं राजद्रोही कारटा निपजला !

सावित्री : सरकारी नोकरीची बेडी तोडून तो स्वतः मुक्त झाला आणि आपल्या मातृभूमीला परक्यांच्या गुलामगिरींतून सोडविण्यासाठीं त्यानं हातीं खड्ग धारण केलं आहे. हाच खरा मोक्षाचा मार्ग आहे !

मोक्षमार्ग हा, एकचि खरा, रणधीरा । राष्ट्रमोचन
निर्धारा ।। धृ० ।। पारतंत्र्यसुरा, पाजुनि गोरा । गुंगवि
सकला बुधाबुधा ।। १ ।। असिधाराव्रता, सेवि जनता ।
देइल उलथुनी परकीय सत्ता ।। २ ।।

विसाजी : अग पण गधडे, राणीचं राज्य झाल्यामुळं प्रजा किती सुखांत आहे बरं ! नाहींतर काय ती मराठ्यांची बेबंदशाही आणि पेशव्यांची अंधेरनगरी !

सावित्री : बाबा, हें खरं सुख नसून सुखाचं केवळ मृगजळ आहे.

विसाजी : इंग्रजांच्या राज्यांत काठीला सोनं बांधून सुखानं काशीयात्रा करावी. वाघाल्यांडग्यांची कीं चोराचिलटांची बिलकुल भीति बाळगायला नको.

सावित्री : पण नाना प्रकारचे कर बसवून गोरगरिबांचं रक्तशोषण करणाऱ्या सरकारची व सावकारांचीच रयतेला आजकाल अधिक भीति वाटूं लागली आहे. गांजून गेली आहे सारी प्रजा !

रामा : म्हणे काठीला सोनं बांधून सुखानं काशीयात्रा करावी ! पण सोनं जवळ असेल तर ना ? फक्त शिलंगणाचं सोनं शिल्लक राहिलं आहे. सोनं गेलं आणि नुसती काठी मात्र जवळ राहिली आहे !

विसाजी : तुम्हां कामचुकार नोकरांची पाठ फोडून काढायला ती आमच्या उपयोगी पडते आहे.

रामा : पगार नाहीं मिळाला तरी कामांत कुचराई होणार नाहीं कधीं !

विसाजी : पोरी पहात काय उभी राहिली आहेस ? तुझ्या आईच्या गळयांत घातलेला तो हार अगोदर इकडे घेऊन ये पाहूं. तो हार मी माझ्या हातांनीं मायबाप महाराणीसाहेबांच्या गळयांत घालणार आहें. जा, घेऊन ये तो हार .

सावित्री : मी आज तरी तो हार आईच्या गळयांतून काढणार नाहीं. हां, उद्यां तो मी तुम्हांला खचित देईन.

विसाजी : तो सुकलेला, कोमेजलेला बासा हार मी महाराणीसाहेबांच्या तसबिरीला घालूं ? फाजील नाहीं तर !

सावित्री : त्याच्यावर थोडा पाण्याचा शिडकावा दिला, हवं तर गुलाबपाण्याचा हबका दिला, म्हणजे तो पुनरपि सुगंधी व टवटवीत होईल !

विसाजी : फाजीलपणा पुरे कर. आणि अगोदर तो हार घेऊन ये.

सावित्री : माझ्या आईच्या गळयांत मीं भक्तिभावानं घातलेला हार—

विसाजी : घेऊन ये अगोदर. आणि या आईच्या आईच्या, आपणां सर्वांच्या वन्दनीय मातेच्या गळयांत घाल.

सावित्री : प्राण गेला तरी ही गोष्ट मी करणार नाहीं.

विसाजी : कार्टी बेसुमार झाली. राम्या, तूं जाऊन तो हार घेऊन ये पाहूं.

रामा : पगार नाहीं मिळाला तरी नोकरींत कुचराई होणार नाहीं कधीं.

विसाजी : म्हणूनच म्हणतों आंत जा आणि देवघरांतून तो फुलांचा हार घेऊन ये.

सावित्री : देवघरांत जाऊन शिवाशीव केलीस तर खबरदार!

रामा : पगार नाहीं मिळाला तरी नोकरींत कुचराई होणार नाहीं कधीं. पण धनीसाहेब, ताईसाहेब म्हणतात शिवाशीव—

विसाजी : अरे मूर्खा, आज हिंदुस्थानच्या सार्वभौम सम्राज्ञी कोण आहेत माहीत आहे तुला?

रामा : तें कांहीं मला माहीत नाहीं. पण या घराच्या मुख्य मालकीण या आमच्या ताईसाहेब आहेत.

विसाजी : पण मी तिचा बाप आहें. मी सांगतों, नव्हे, माझा हुकूम आहे, तो हार तूं बेलाशक घेऊन ये. सरकारच्या सेवेंत शिवाशिवीचा सुतराम् संबंध नसतो.

रामा : असं आहे का? तर मग हा निघालों पहा. पगार नाहीं मिळाला तरी कामांत कुचराई होणार नाहीं कधीं. (जाऊं लागतो.)

सावित्री : तंगडं मोडून टाकीन देवघरांत पाऊल टाकशील तर!

विसाजी : पाऊल मागं घेशील तर या आखणीनं पाठ सडकून काढीन.

रामा : अरेच्या! मृदंगाला दोन्हीकडून थपडा! आतां मी करूं तरी काय?

विसाजी : मुकाट्यानं हार आण नाहींतर मार खा. (मारतो.)

सावित्री : बाबा, कां उगीच त्या गरीबाला मारतां? तुमची ही आंधळी राजनिष्ठा पाहून मनाला मोठा उद्वेग वाटतो! तुम्हांला देवाधर्माची चाड नाहीं कीं पूर्वजांची प्रतिष्ठा राहिली नाहीं. इंग्रज म्हणजे परब्रह्म वाटतं तुम्हांला. परक्यांची पूजाअर्चा करण्यांत तुम्हांला तुमच्या जन्माचं सार्थक झालसं वाटतं! या तुमच्या अनिवार राजनिष्ठेची उबग येऊनच, तुमचा मुलगा—माझा एकुलता एक भाऊ—विनायक घरांतून निघून गेला.

विसाजी : नुसता निघून नाहीं गेला. तर त्या वाश्याच्या टोळींत सामील झाला!

सावित्री : गुलामगिरीच्या दुर्गंधीनं बेचैन झालेल्या, महाराष्ट्रांतील स्वातंत्र्यवादी तरुणांना तोच एक निदानींचा आधार आहे.

विसाजी : काळं फासलंन् माझ्या तोंडाला कारट्यानं! यापेक्षां गेल्या वर्षीच्या

महामारीच्या साथींत मेला असता, तर त्याच्या नांवानं बोंब मारून मी मोकळा तरी झालों असतों !

सावित्री : आहाहा ! पितृमुखांतून काय पण मुक्ताफळं बाहेर पडताहेत !

रामा : (स्वगत) खाटिकसुद्धां याच्यापेक्षां मायाळू असतात. हा बाप नाहीं. साप आहे साप !

विसाजी : त्या विन्यानं वाड्याच्या टोळींत शिरून माझ्यामागं सरकारी नौकरीचा नसता ससेमिरा लावला आहे. कुलाब्यास जाऊन वारंवार वरिष्ठ साहेबाच्या टोपीला खूष करतां करतां टाके ढिले होताहेत. आणि प्रत्येक वेळीं नजराणे देतां देतां तिजोरी रिकामी होत आहे माझी ! पितृऋण चांगलं फेडलं कार्ट्यानं !

सावित्री : पितृऋणापेक्षां मातृभूमीचं ऋण फेडणं हेंच आजकालच्या तरुणांचं प्रमुख कर्तव्य आहे. आणि विनायक दादानं तेंच पवित्र कार्य पत्करलं आहे. देव त्याला शतायुषी करो !

विसाजी : कावळयाच्या शापानं ढोरं मरत नाहींत आणि मूर्ख मुलींच्या प्रार्थनेनं व्रात्य पोरं शतायुषी होत नाहींत. पण या फालतू गोष्टी बोलत बसायला मला वेळ नाहीं. मी स्वतः जाऊन देवघरांतून तो हार घेऊन येतो. तुमची एवढी पत्राज नको. (आंत जातो.)

रामा : पण धनीसाहेब, सोवळं नेसून देवघरांत जा. म्हणजे विटाळ होणार नाहीं.

सावित्री : अस्सं आहे का ! तर मग मी पण बाबांची चांगलीच खोड मोडते. रामा, ती तसबीर तिथून काढ आणि वाड्याच्या पाठीमागं ती ओसाड विहीर आहे त्यांत नेऊन टाक. चल, आटप जलदी.

(दोघेजण मिळून तसबीर काढूं लागतात.)

रामा : हां, आईसाहेब, चला, आतां तुम्हांला जलसमाधी देतो.

सावित्री : हां, चल, आटप लवकर. बाबा आले वाटतं !

विसाजी : (प्र. क.) छट्, तें निर्माल्य आईसाहेबांच्या गळयांत घालणं म्हणजे शुद्ध गाढवपणा आहे. काय रे, त्या तसबिरीशीं काय करताहांत ?

रामा : आईसाहेबांना न्हायला घालणार होतों.

विसाजी : चला व्हा दोघेंही बाजूला. तुम्हां पाप्यांचा त्या तसबिरीस विटाळ होतां कामा नये.

सावित्री : पण बाबा, सरकारसेवेंत विटाळचंडाळ, शिवाशीव यांचा सुतराम् संबंध नसतो ना!

विसाजी : चूप राहा. चल चालती हो आपल्या कामाला. (सावित्री जाते.) आईसाहेब, आज आपल्याला हार मिळाला नाहीं म्हणून रुष्ट होऊं नका. उद्यां दोन हार घालून मी आपली भरपाई करून देईन. (पडद्यांत–" सावकार आहेत कां " अशी **गुणाजी** पाटील हांक मारतात.) रामा, पहा बरं कोण आलंय् तें. (रामा दारापाशीं जाऊन पहातो.)

रामा : आपले खालापूरचे गुणाजी पाटील आले आहेत.

विसाजी : (स्वगत) भोळे मासे जाळयांत अडकण्यासाठीं कसे आपसुक येतात. ही सारी मायबाप राणी सरकारांची कृपा. रामा, जा त्यांना आंत घेऊन ये. (रामा जातो.) या भोळयाभाबड्या शेतकऱ्यांच्या अज्ञानाच्या भांडवलावर आमची सावकारी पिढ्यान्‌पिढ्या चालत आली आहे. (६०।६५ वर्षांचे ऐटबाज मिशा राखलेले **गुणाजी** पाटील काठी टेकीत टेकीत प्रवेश करतात. रामाही येतो.)

गुणाजी : राम राम सावकार.

विसाजी : या पाटील. बरेच थकलात हो. आतां पूर्वीची तब्येत राहिली नाहीं. बसा. अरे रामा, पाटलांना बसायला गालिचा दे पाहूं!

गुणाजी : काय करायचा आहे गालिचा? आम्हां गरिबांना ही घोंगडी ब्येस आहे कीं. (घोंगडी अंथरून तिच्यावर बसतात.)

विसाजी : बरं, पाटील, आज मुद्दाम कशासाठीं तसदी घेतलीत इथवर येण्याची?

गुणाजी : सावकार, एक गरज कराल तर गरिबावर उपकार होतील!

विसाजी : गरज! कसली बाबा गरज?

गुणाजी : यंदा राधाचं लगीन करायचं म्हणतो—

विसाजी : रायाचं लगीन करतां पाटील ?

गुणाजी : होय सावकार.

विसाजी : मग आम्हांला लाडू खायला घालणार म्हणायचे तुम्ही ?

गुणाजी : आपण कृपा केली तर.

विसाजी : आमची कसली कृपा घेऊन बसलां आहांत ! (व्हिक्टोरिया राणीच्या फोटोकडे पाहून) या आपणां सर्वांच्या आईसाहेबांची मेहरनजर पाहिजे. बाई माणूस; पण केवढं सामर्थ्य आहे त्यांचं ! हजारों मैलांवरून हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा सुरळीत चालवला आहे त्यांनीं. जणूं रामराज्यच !

गुणाजी : हात जोडतो या रामराज्याला !

रामा : अगदीं कोपरापासून नमस्कार असो या गोऱ्या रामाला आन् त्याच्या रामराज्याला ! रामराज्य कसलं ! माकडराज्य आहे झालं !

गुणाजी : म्हणून म्हणतों, यावेळीं जरा गरज कराल तर मोठे उपकार होतील.

विसाजी : किती रक्कम पाहिजे तुम्हांला ?

गुणाजी : कसंही करून पांचशें रुपयांची गरज करा सावकार !

विसाजी : किती ? पांचशें रुपये ?

गुणाजी : होय मायबाप. पांचशें रुपये.

विसाजी : (मोठ्यानं हंसून) पाटील, आतां मात्र तुम्हांला वेड्यांच्या दवाखान्यांत पाठवलं पाहिजे.

गुणाजी : मुलाचं लगीन करतोय यांत वेडेपणा कसला आहे ?

विसाजी : अहो वेडेपणा नाहींतर काय ? दुष्काळ पडतोय; गुरं मरताहेत; भुकेनं तडफडून माणसं पटापट प्राण सोडताहेत; आणि अशा वेळीं पोरांचीं लग्नं किंवा पोरींचीं ओटभरणं कसलीं कर्मांचीं करीत बसलां आहांत !

गुणाजी : माझं वय झालेलं ! हें पिकलं पान केव्हां गळून पडेल त्याचा नेम नाहीं. म्हणून डोळ्यांदेखत रायाचं लगीन उरकून टाकावं म्हणतो.

विसाजी : उरक असला तुमच्यांत तर खुशाल उरका ना लगीन ! त्यांत आमच्या पदराला खार थोडाच लागणार आहे !

गुणाजी : मग सावकार, येते का दया गरिबाची ? का मरावं आम्हीं कंगालांनीं ?

विसाजी : नका नका, पाटील, रडूं नका आणि आमचं कर्ज फेडल्याशिवाय मरूंही नका ! कुळानं मरावं असं कोणत्याच सावकाराला वाटणार नाहीं. कूळ हें सावकारीचं मूळ आहे. म्हणून कुळानं चिरंजीव होऊन, सावकाराचं कर्ज अक्षयीं फेडीत राहावं असं आमचं प्रामाणिक मत आहे.

गुणाजी : मग सावकार, करतां ना आमचं काम ?

विसाजी : अहो, देवानं आम्हांला जो एवढा पैसा दिला आहे, तो काय नुसता तिजोरींत ठेवून बुरसवण्यासाठीं ? कीं जमिनींत पुरून कुजवण्यासाठीं ? नाहीं बरं पाटील ! अहो, गोरगरिबांच्या आणि रंजल्यागांजलेल्यांच्या उपयोगासाठींच, परमेश्वरानं हा संपत्तीचा ठेवा आम्हां सावकारांच्या स्वाधीन केला आहे. या देवदत्त संपत्तीचे आम्ही मालक नसून केवळ रखवालदार आहोंत समजलांत.

गुणाजी : मग करतां ना माझी गरज ?

विसाजी : गोरगरिबांच्या धनाला आम्ही शिवनिर्माल्य समजून तिजोरींत ठेवीत असतों. ' परावीया नारी रुक्मिणीसमान आणि पराचीये धन विष्टे-समान ' असं तुकोबारायाप्रमाणं आमचं कडक व्रत आहे बरं !

गुणाजी : तुकोबारायाची थोरवी काय वर्णन करावी !

रामा : (गुणाजीस हळूच) विमानांत बसून सदेह वैकुंठास गेलेले तुकाराम महाराज, विमानाला अपघात होऊन सदेह खालीं आले आहेत असं नाहीं तुम्हांला वाटत ?

विसाजी : माझी सर्व संपत्ती गोरगरिबांच्या सेवेला सदैव तत्पर आहे; बरं, रकमेला तारण काय देणार ?

रामा : (स्वगत) वाघानं पंजा बाहेर काढला बघा !

विसाजी : बोला; तारण काय ठेवणार ?

गुणाजी : पण शेटजी, आपला व आमचा व्यवहार आजचा का हाय ? गेल्या तीन पिढ्यांचा आपला ऋणानुबंध आहे.

विसाजी : तें कांहीं मी जाणत नाहीं. योग्य तारणाशिवाय यापुढं एक पैसुद्धां कुणाला द्यायची नाहीं असा आम्हीं दृढ संकल्प केला आहे. ते

पुण्यास एक शेतकऱ्यांचे कैवारी वासुदेव बळवंत निघाले आहेत ना! त्यानं साऱ्या शेतकऱ्यांना बहकून टाकलं आहे.

गुणाजी : पण सावकार, माझ्याबद्दल आपल्या मनांत किंतु यायला नको आहे.

विसाजी : तुम्ही काय अन् बाकीचे शेतकरी काय; शुद्ध मेंढरं आहांत मेंढरं!

गुणाजी : काय, आम्ही मेंढरं? कांदाभाकर खाऊन, उन्हातान्हांत अष्टौप्रहर राबून, श्रीमंतांचे कुणगे कांठोकांठ भरणाऱ्या आम्हां कुणब्यांना मेंढरं म्हणून हिणवूं नका सावकार!

रामा : शेतकरी मरमर राबतो म्हणून तुम्हां सावकारांना खायला मिळतंय. नाहींतर टाचा घाशीत तुम्हां सर्वांना मरावं लागलं असतं सावकार!

विसाजी : मेंढरं तीं मेंढरं आणि वाघाची गुरगुर! तो वाशा धनगर या खुळ्यांना राणीच्या राज्याविरुद्ध आणि सावकारांविरुद्ध चिथावणी देतो, आणि हीं मेंढरं सरकारी दस्त देण्याची किंवा सावकाराचं कर्ज फेडण्याची टाळाटाळ करतात.

गुणाजी : पीकपाण्यानुसार रास्त दस्त द्यायला कोणताच शेतकरी कुरकुरणार नाहीं.

रामा : आणि योग्य व्याजानं रक्कम देणाऱ्या सावकाराला, कोणता शेतकरी खाका वर करून वाटेला लावणार आहे?

विसाजी : 'हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या मागं' तशी यांची गत! हें पहा पाटील, आतांपर्यंत तुम्हीं सचोटी राखलीत. पण उद्यां तुमची मति पालटली आणि तुम्हीं आम्हांला अंगठा दाखवलात तर काय घ्या तुमचं? म्हणून सांगतों, तारणाशिवाय तुम्हांला कपर्दिकही मिळणार नाहीं यापुढं! हो, आधीं कडू आन् मागून गोड असलेलं बरं!

गुणाजी : ठीक आहे. माझी पन्नास बिघे जमीन तारण ठेवतों सावकार.

विसाजी : (विचार करीत) पन्नास बिघे जमिनीच्या तारणावर पूर्वींचे तीनशें साठ आणि आतांचे–किती पाहिजेत म्हणालात?

गुणाजी : पांचशें रुपये.

विसाजी : हो पांचशें. म्हणजे सर्व मिळून आठशें साठ मुद्दल, आणि त्याचं व्याज–व्याज–छे. हें तारण अपुरं आहे पाटील.

गुणाजी : तेवढ्यावरच भागवून घ्या सावकार.

विसाजी : ही भागवाभागवीची भाषा आम्हांला मुळींच कबूल नाहीं.

गुणाजी : सावकार, नका आतां अधिक अंत पाहूं.

विसाजी : पाटील, नका आतां अधिक त्रास देऊं! तुमच्यांत पुरेसं तारण देण्याचं त्राण नसेल, तर तुम्ही आपले दुसऱ्या सावकाराकडे जा.

गुणाजी : (डोळयांत पाणी आणून) तर मग सावकार, माझं रहातं घर तारण लावून घ्या.

विसाजी : जमीन चांगली सुपीक आहे ना ? तसंच घर अगदीं मोडकळीस तर आलेलं नाहीं ना ? हो, नाहींतर आम्ही जप्ती बजवायला जायचे आन् एकदम घर कोसळून आम्हांला जिवंत समाधी मिळायची ! तारण राह्यचं बाजूला आन् बेलिफासकट आमचं मरण मात्र ओढवायचं ! घर चांगलं मजबूत आहे ना पाटील ?

गुणाजी : आमच्या पणजोबांनीं बांधलेला पक्का चिरेबंदी चौसोपी वाडा आहे.

रामा : खालापुरांतला तो जणुं शनवारवाडाच आहे म्हणा ना ! गेल्या पाऊणशें वर्षांत चिरा हालला नाहीं कीं चुना ढळला नाहीं. धनीसाहेब, हा तुमचा वाडा झक मारतो त्याच्यापुढं !

विसाजी : असं म्हणतोस ? बरं. बर तर. एवढ्या तारणावर तुम्हांला रकम द्यायला एकंदरींत कांहींच हरकत नाहीं.

गुणाजी : मग लिहा कागद.

विसाजी : कागद लिहूं ? पण कागद कशाला ? तुमच्यावर माझा विश्वास आहे.

रामा : (स्वगत) पण तुमच्यावर आमचा विश्वास नाहीं ना !

गुणाजी : व्यवहाराला माणसानं चोख असलं पाहिजे.

विसाजी : पण मला वाटतं कागद करण्याची कांहीं जरूर नाहीं. गुणाजी पाटील शब्दाला कधीं उणेपणा आणणार नाहींत अशी आमची बालंबाल खात्री आहे.

गुणाजी : पण सावकार, आतां टोपीवाल्याचं राज्य आहे ना ! माणसाची केव्हां कशी बुद्धि फिरेल ह्याचा नेम नाहीं.

विसाजी : पण पाटील, तुमचा आमचा आज तीन पिढ्यांचा व्यवहार आहे. नुसत्या शब्दावर शेंकडों वेळां तुम्हीं रकमा नेल्या आहेत आन् आम्ही डोळे मिटून दिल्या आहेत.

गुणाजी : आन् त्या सर्व वेळच्यावेळीं या म्हाताऱ्यानं फेडल्या आहेत.

विसाजी : मी नाहीं कुठं म्हणतों आहे ? सचोटी हा तर शेतकऱ्यांचा मुख्य गुण !

रामा : (स्वगत) आन् बदमाषी हा तर सावकारांचा मुख्य दुर्गुण !

विसाजी : मला वाटतं कागद करण्याची कांहीं जरूरी नाहीं. उगीच कागदाचा खर्च—

गुणाजी : कागदाचा खर्च, लिहिणावळ वगैरे सर्व खर्च मी करीन. त्याची आपल्याला मुळींच काळजी नको.

विसाजी : मग कांहीं हरकत नाहीं. (कागद लिहूं लागतो.)

रामा : (स्वगत) अगदीं मढ्याच्या टाळूवरचं लोणी, चाटून पुसून खाणारा बांडा बोका आहे कीं नाहीं ? (गुणाजी बटवा काढून तंबाकू व चिलीम बाहेर काढतो. तंबाकू साफ करून चिल्मींत भरतो.)

विसाजी : अरे रामा, पाटलांना सापी भिजवून दे. (रामा फडकं घेऊन आंत जातो.) या गोष्टीसुद्धां गाढवांना सांगाव्या लागतात. कामाचा नेहमीं कंटाळा आणि पोस्त आन् पगारवाढीचा लकडा रोजचा. (रामा येतो.)

रामा : तरी बरं, गेल्या सहा महिन्यांचा पगार बाकी आहे, आन् पोस्ताची परवड तर विचारूंच नका. शिमग्याचं पोस्त दिवाळीला आन् दिवाळीचं पोस्त होळीला !

विसाजी : आतां तर पोस्त देण्याचंच आम्ही अजिबात बंद करणार आहोंत.

गुणाजी : तें हो कां सावकार ?

विसाजी : अहो, दिवाळीचं पोस्त घेऊनच्या घेऊन, हे लेकाचे होळीला वाईटसाईट फाका घालून, आमच्या नांवानं वर बोंबा मारायला कमी करीत नाहींत.

रामा : मग, तो आमचा जन्मसिद्ध हक्क आहे ! (रामाही मधूनमधून चिलमीचे झुरके मारतो. विसाजी झरझर कागद लिहून पुरा करतो.)

विसाजी : हां. झाला हा कागद तयार. पाटील, याच्यावर आतां सही करा. हो, पण अगोदर तुम्हांला वाचून दाखवतों.

गुणाजी : कांहीं नको वाचायला. सावकार, आपण भलतं सलतं थोडंच लिहिणार आहांत कागदांत ?

विसाजी : बरं तर. इथं सही करा. पण पाटील, तुम्हांला सही करतां येते का ?

गुणाजी : छे हो ! आम्हां अडाण्यांना लिहितां वाचतां कुठलं यायला ? पण सावकार, आज ६० वर्षांची उमर, सहीशिवाय शहाजोग रीतीनं या म्हाताऱ्यानं घालविली आहे बघा.

विसाजी : (स्वगत) शेतकऱ्यांना लिहितां वाचतां येत नाहीं म्हणून तर त्यांची सोन्याची लंका मनसोक्त लुटायला सांपडते आहे आम्हांला !

गुणाजी : पण पोरगा राया बरीक, मिशनऱ्यांच्या शाळेंत जाऊं लागला आहे.

विसाजी : त्याला पहिल्या प्रथम शाळेंतून काढा. शेतकऱ्यांचीं मुलं शाळेंत जाणं म्हणजे शेतकरी कंगाल होण्याचं लक्षण आहे; दुसरं काय ?

रामा : (स्वगत) किंवा सावकारांच्या काळजांत कळ उठण्याचं लक्षण आहे.

विसाजी : बरं तर. अंगठा घेऊं कागदावर. रामा, अंगठा धरून उभा राहा.

रामा : अंगठे धरून उभा राहूं ? (पाटलांचा उजवा अंगठा धरून हात पुढं करतो.)

विसाजी : अरे, उजवा नव्हे, डावा अंगठा पुढं कर. व्यवहारांत डावा हात निषिद्ध असला तरी कायद्याच्या कामांत उजव्यापेक्षां डाव्याचंच महत्त्व अधिक असतं, समजलास ! हां, व्यवहारांत आणि कायद्यांत असं उजवं डावं असायचंच ! (पाटलांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला शाई लावून) हां, आतां या ठिकाणीं अंगठा उठवा. (पाटील त्याप्रमाणं अंगठा उठवतात.) छे, असं नाहीं कामाचं. चांगला ठसठशीत उमटला पाहिजे. (आपल्या पायानं पाटलांचा अंगठा जोरानं दाबतो.) हां, आतां मनासारखा उमटला ! बरं रामा, तूं इथं तुझी साक्ष घाल. सही येते ना ?

रामा : हो तर. त्या पाद्यानं शिकविली आहे ना !

विसाजी : आन् त्यानं पावभिस्कूटही तुला खायला घातलं असेल ? मूर्खांनो, त्याच्या गायवर्णी वागण्याला आणि गुळचट भाषणाला भुलाल आणि आपला

धर्म गमावून बसाल. मुद्दाम सावधगिरीचा इषारा देऊन ठेवतों. बरं. कर इथं सही. (तो 'रामचंद्र दशरथ मालुसरे' अशी सही करतो.) ठीक आहे. पाटील, तुम्ही जरा बसा. मी आंत जाऊन तिजोरींतून रक्कम घेऊन येतों. तुम्ही जरा दम मारा. रामा, सापी भिजवून दे त्यांना. (जातो.)

रामा : वा रे वा ! काय पण नमुनेदार माणूस आहे ! सारे मानव निर्माण केल्यावर, राहिल्या साहिल्या गाळांतून, ब्रह्मदेवानं ही गाळीव मूर्ति निर्माण केली असावी ! (आंत जाऊन सापी भिजवून आणतो.)

गुणाजी : काय रे रामा, ताईसाहेब घरांत आहेत ना ?

रामा : हो, आंत दिवाळीचे पदार्थ करताहेत.

गुणाजी : मग त्यांना जरा बाहेर बोलावतोस का ? त्यांना लग्नाचं आमंत्रण दिलं पाहिजे. मोठी गुणाची पोर आहे.

रामा : खरं आहे. या दगडाच्या खाणींत ती हिरकणी निपजली आहे असंच म्हटलं पाहिजे. बोलवून आणतों त्यांना. (जातो.)

गुणाजी : सावित्रीबाय म्हणजे सावकाराच्या घरची साक्षात् लक्ष्मी आहे. बिचारीची माय लहानपणींच हरपली. एकला भाऊही परदेशी झाला. सावकाराचा तर हा असा कारभार ! मायेचं माणूस घरांत नाहीं. पण पोरीनं सगळा घर-संसार कसा सुरळीत चालवला आहे. आल्यागेल्याची कळकळीनं विचारपूस केल्याशिवाय माउलीनं कधीं अन्न घेतलं नाहीं. देव तिचं भलं करो ! (केळीच्या पानांत फराळाचे जिन्नस बांधून सावित्री व मागून रामा येतो.)

सावित्री : पाटील, खुशाल आहांत ना ? मुलंमाणसं सुखरूप ?

गुणाजी : आपल्या पायांच्या कृपेनं सर्व खुशाल आहेत.

सावित्री : बरं, कां आला होतांत ? कांहीं अडचण आहे वाटतं ? मला सांगा. माझ्याकडून दूर होण्यासारखी असली तर मी अवश्य दूर करीन. संकोच बाळगूं नका.

गुणाजी : ताईसाहेब, यंदा रायाचं लगीन करायचं म्हणतो. तेव्हां सावकारांच्याकडे पैसे मागायला आलों होतों.

सावित्री : मग मिळाले का पैसे ?

गुणाजी : हो. तेच आणायला सावकार आंत गेले आहेत.

सावित्री : पण बाबांनीं तावडतोब पैसे द्यायचं कबूल केलं हें मोठं नवलच म्हणायचं !

रामा : भरभक्कम तारण घेऊन मगच धनीसाहेब पैसे द्यायला कबूल झाले.

सावित्री : काय तारण घेतलं आहे ?

गुणाजी : कांहीं नाहीं. माझी पन्नास बिघे जमीन व रहातं घर तारण म्हणून मीं दिलं आहे. कागदसुद्धां लिहून घेतला आहे सावकारांनीं !

रामा : आणि माझी त्याच्यावर साक्ष आहे. काय सांगूं ताईसाहेब, घर तारण देतांना पाटलांच्या डोळ्यांतून टचकन् पाणी गळलं !

गुणाजी : पैशांची तर गरज आणि सावकार कांहीं ऐकेनात. मग काय करणार ? डोळ्यांवाटे घरावर पाणी सोडलं झालं !

सावित्री : पाटील, तुम्ही कांहीं चिंता करूं नका. तुमचं घर आन् जमिनीची तसूसडीही बाबांना मी गिळंकृत करूं द्यायची नाहीं.

(पैशाची थैली घेऊन विसाजीपंत येतात.)

विसाजी : हां. ही घ्या रक्कम. खरेखोटे नीट तपासून घ्या. कमीअधिक नीट मोजून पहा. हो, मागाहून तक्रार नको.

गुणाजी : कांहीं नको मोजून पहायला. आपण लबाडी थोडीच करणार आहांत सावकार ?

विसाजी : आमचा व्यवहार चोख असतो.

रामा : (स्वगत) फक्त कर्ज द्यायच्या वेळीं. पगार द्यायच्या वेळीं नव्हे !

गुणाजी : बरं आहे सावकार, येतों. लग्नाला जरूर यायचं. ताईसाहेब, तुम्हांलाही आलं पाहिजे. मूळचिठी येईलच. पण समक्ष सुचवून ठेवतों. रामा, तुलाही सुपारी देऊन ठेवतों. (बटव्यांतून सुपारी काढून देतो.)

विसाजी : (हळूच) ती तबकांत ठेवून दे.

सावित्री : थांबा पाटील. मी लग्नाला येईनच. पण हा माझा आहेर घेऊन जा. (हातांतले गोठ काढून देते.) तुमच्या सुनेच्या हातांत खुलून दिसतील !

विसाजी : हां हां सावित्री, हें काय ? एवढा मोठा आहेर ?

सावित्री : आपल्या मोठेपणाला साजेसाच हा आहेर आहे. पाटील, जा तुम्ही. दिवाळी आनंदांत साजरी करा. आन् लगीन झोकांत पार पाडा.

गुणाजी : पांडुरंग तुमचं भलं करील. घरचंच कार्य समजून लग्नाला जरूर यायचं बरं सावकार! (गुणाजी जातो.)

विसाजी : (स्व.) शेतकऱ्याच्या घरीं आम्ही लग्नाला कसचे येतों. आम्ही म्हणजे जत्ती बजवायला शेतकऱ्याच्या घरीं जायचे! (उ.) मूर्ख पोरी, काय म्हणावं तुझ्या गाढवपणाला. एखाद्या भिकाऱ्याच्या अंगावर आम्ही जशी पै दुगाणी फेकतों, त्याप्रमाणं बारा तोळ्यांचे गोठ तूं या दरिद्री शेतकऱ्याला आहेर म्हणून देऊन टाकलेस?

सावित्री : मग त्यांत काय बिघडलं? माझा बाप एवढा धनंतर असतांना मी काय पांच रुपयांचा बांड किंवा एखादा नकली दागिना आहेर करावा? शीः! माझ्या बाबांची नाचक्की होईल साऱ्या मुलुखांत.

विसाजी : मी पै पै करून धन मिळवतों आणि ही कार्टी जणुं काय कर्णाचा अवतार बनून तें धन उधळून टाकते. अशानं आम्हांला लवकरच चौपदरी घेण्याची पाळी यायची!

सावित्री : बाबा, आजकाल सर्वत्र दरोडे पडताहेत. तसाच उद्यां आपल्या वाड्यावरही वासुदेव बळवंताचा दरोडा पडला—

विसाजी : चूप. ही तिनसांजची वेळ आहे. कांहीं अभद्र बोलूं नको. आज लक्ष्मीपूजन आहे. देवघरांत पूजेची तयारी कर. मी तिजोरींतलं जडजवाहीर व रोकड घेऊन येतों. अरे रामा, तूं लाह्या बत्तासे वगैरे सामान घेऊन ये. हे घे पैसे. (पैसे काढून देतो. रामा जातो.) जा. पोरी, पूजेची तयारी कर. झटपट पूजा करून पुन्हा सर्व ऐवज तिजोरींत सुरक्षित ठेवला पाहिजे. काळ मोठा बिकट आहे! (विसाजी जातो.)

सावित्री : काय ही बाबांची धनलालसा—

> **धनलालसा, करि मनुजा वेडापिसा ।। धृ० ।। गोरगरिबां गांजुनी । द्रव्यसंचय करी । धेनुव्रणछेदनीं, तृप्त वायस जसा ।। १ ।। परदुःख साधनें । आत्मसुख वांच्छि जो । किमपि नच लाभते । शांति त्या मानसा ।। २ ।।**

6214 dt 30·5·61

आतां दोन दिवसांनीं भाऊबीज येईल. गेल्या वर्षी माझा भाऊ विनायकदादा होता. पण या वर्षी मी कोणाला ओवाळूं ? ('सावित्री' 'सावित्री' अशा हांका मारीत **विनायक** प्रवेश करतो.) कोण रे बाबा तूं !

विनायक : सावित्री, तूं मला ओळखलं नाहींस ?

सावित्री : कोण बरं असावा ? आवाज तर ओळखीचा वाटतो !

विनायक : अवघ्या एक वर्षांत सृष्टीची एवढी उलथापालथ झाली काय, कीं बहिणीला भावाची ओळख पटूं नये !

सावित्री : ओळखलं ! पूर्ण ओळखलं ! माझा भाऊ विनायकदादाच हा ! दादा, दादा—(एकदम जवळ जाऊन त्याला कडकडून भेटते.)

विनायक : बरं, पण बाबा कुठं आहेत ?

सावित्री : आज लक्ष्मीपूजन, म्हणून तिजोरींतलं सर्व जडजवाहीर पूजेसाठीं देवघरांत आणायला आंत गेले आहेत.

विनायक : (हंसून) हें फार छान झालं. तिजोरी फोडण्याचे आमचे आयते श्रम वांचले !

सावित्री : म्हणजे दादा, तूं म्हणतोस तरी काय ?

विनायक : आज स्वातंत्र्यवीर वासुदेव बळवंतांचा, या वाड्यावर छापा पडणार आहे.

सावित्री : अग बाई !

विनायक : पण तुला घाबरण्याचं कांहीं कारण नाहीं. कारण स्त्रियांना आणि स्त्रीधनाला टोळींतील कोणीही स्पर्श करतां कामा नये, असा आमच्या नेत्याचा सर्वांना सक्त हुकूम आहे.

सावित्री : दादा, मी स्वतःसाठीं नाहीं घाबरलें. तर बाबांची आतां काय अवस्था होणार, या कल्पनेनं मला भय वाटलं !

विनायक : त्यांची काय अवस्था व्हायची ? त्यांनीं आम्हांला हवा असलेला पैसा मुकाट्यानं दिला तर ठीक. नाहींतर इतर ठिकाणच्या सावकारांची जी गत झाली तीच बाबांची होईल, दुसरं काय ? बरं, अगोदर पंचारती आण पाहूं.

सावित्री : आत्तां पंचारती ?

विनायक : होय आत्तां. भाऊबीज जरी दोन दिवसावर आहे, तरी मला कांहीं पुन्हा इकडे यायला सवड मिळणार नाहीं. तेव्हां बहिणीनं भावाकडून दरसाल वसूल करण्याचा तो करभार, आतांच वसूल करून घ्यावा !

सावित्री : मग बायकांचा तो हक्कच आहे मुळीं ! थांब हं. पंचारती घेऊन येते.

विनायक : नुसती पंचारतीच आण. फराळ करीत बसायला मला यावेळीं फुरसत नाहीं. आत्तां महाराजांची स्वारी येईल. (ती जाते.) हें माझं घर, ही माझी दौलत, आज मी दरोडेखोरांना लुटूं देणार आहें. इतकंच नव्हे, तर मी त्यांचा साथीदार बनून स्वतः लुटणार आहें. (सावित्री एका तबकांत फराळाचं व दुसऱ्या तबकांत पंचारती घेऊन येते.) हां, ओवाळ जल्दी.

सावित्री : एक कानोला तोंडांत टाकल्याशिवाय मी नाहीं ओवाळायची ! निगोड भाऊबीज कोणती बहीण साजरी करील ?

(तो तबकांतला एक कानोला उचलून तोंडांत टाकतो. सावित्री त्याला यथाविधि ओवाळते. तो तिच्या ओवाळणींत पिस्तुल टाकतो.)

सावित्री : अगबाई ! ही कसली ओवाळणी ?

विनायक : हें टोपीवाल्याचं शस्त्र आहे. त्याच्याच शस्त्रानं त्याला उडवायचा असं महाराजांनीं ठरवलं आहे.

सावित्री : खरंच, माझ्या भाऊरायानं आज ही अपूर्व ओवाळणी घालून मला धन्य केलं ! पण काय रे दादा, हें वापरायचं कसं ?

विनायक : तें सध्यां भरून तयार आहे; हा चाप निशाण धरून खेचायचा कीं शत्रु ठार झालाच म्हणून समज ! आलं लक्षांत ? त्याच्यासाठीं लागणारीं काडतुसं मी तुला गुप्त मार्गानं पोंचतीं करीन. त्याची नको काळजी. मात्र याचा उपयोग दुष्टांच्या हननासाठींच करायचा हें ध्यानांत ठेव. बरं, मी आतां जातों. महाराजांना सामोरं गेलं पाहिजे. (त्वरेनं जातो.)

सावित्री : आज आमच्या वाड्यावर दरोडा पडणार म्हणून मी चिंता करूं कीं त्या थोर स्वातंत्र्यवीराचं दर्शन घडणार म्हणून मी आनंदानं नाचूं ! ही एका देशभक्त भावानं बहिणीला घातलेली राष्ट्रीय ओवाळणी

मी देवघरांतील माझ्या आईच्या तसबिरीमागं जो कोनाडा आहे त्यांत ठेवणार, म्हणजे सुरक्षित राहील. (जाते.)

विसाजी : (आंतून) सावित्री, झाली कीं नाहीं पूजेची सर्व तयारी ? आन् तो रामा जो गेला आहे बत्तासे लाह्या आणायला, त्यानं तिकडेच राम म्हटला कीं काय ? (रामा घाईनं येतो.)

रामा : आतां सर्वांनाच राम म्हणण्याची पाळी येणार ! धनीसाहेब, अहो धनीसाहेब, लवकर इकडे या. (विसाजी येतो.)

विसाजी : काय रे काय झालं ओरडायला ? दिवाळीच्या मंगलप्रसंगीं बोंब मारायला काय झालं ?

रामा : दिवाळी कुठली आली आहे ? आतां आपणां सर्वांचीच होळी पेटणार !

विसाजी : म्हणजे म्हणतोस काय गध्या ?

रामा : अहो धनीसाहेब, वासुदेव बळवंताचा छापा आपल्या वाड्यावर पडणार ! गांवांतील श्रीमंतांचीं घरं लुटून ती सगळी दरोडेखोरांची टोळी आतां आपल्या वाड्याच्या रोखानं येत आहे.

विसाजी : काय आमच्या वाड्याकडे ? अग सावित्री, तें सारं धन गोळा कर. अरे रामा, धांव धांव, तो आपला दिंडीदरवाजा जाम लावून टाक. सावित्री, अग सावित्री ! (सावित्री येते.) कार्टे, त्या बकासुराची धाड आमच्या वाड्यावर पडणार ! जा. वाड्यांतले सर्व दिवे घालवून तूं गुपचूप झोंपून जा.

सावित्री : (स्व.) वरच्या सज्ज्यांतल्या खिडकींतून मी त्या थोर दरोडेखोराला डोळे भरून पहात बसणार ! (जाते.)

विसाजी : या वाऱ्याला पटकी कां होत नाहीं एकदांची ! आणि आमच्या इंग्रज सरकारचं एवढं लष्कर काय नुसतं लोणीपाव खात बसलं आहे ? दरोडा पडण्यापूर्वीं झोंपा ताणायच्या, आन् दरोडेखोर लूट मारून पळून गेले म्हणजे मात्र धावाधाव करायची, ही इथल्या पोलिसांची तऱ्हा ! एवढं बलाढ्य ब्रिटिश सरकारही असं कसं कुतांगळ बनलं अगदीं ! त्यांना या यःकश्चित् दरोडेखोराचं पारिपत्य करतां येऊं नये ! मोठंच आश्चर्य ! !

रामा : धनीसाहेब, आतां काय करायचं हो ?

विसाजी : आतां 'राम नाम सत्य आहे' म्हणायचं ! राम्या, जा, लवकर दरवाजा बंद कर. पण नको. दरवाजा लावला तर घणाचे घाव घालून ते धटिंगण दरोडेखोर, साट्यासकट दरवाजा निखळून पाडतील आणि इमारतीची नासाडी करतील. त्यापेक्षां दरवाजा उघडाच ठेवलेला काय वाईट ? जा, हातांत दंडा घेऊन दरवाजावर पहारा कर.

रामा : पण, त्यांच्या तरवारी व भाल्यापुढं माझा दंडा काय रडणार ? मी कुठंतरी दडून बसतों धनीसाहेब.

विसाजी : मला पैसाअडका अगोदर नापत्ता केला पाहिजे. (आंत जातो.)

(पडद्यांत ढोल, शिंगें व 'शिवाजी महाराज की जय' असा जयघोष होतो.)

रामा : अरे बापरे ! वेताळ महाराजांची स्वारी जवळ आल्यासारखी दिसते ! आतां मी करूं तरी काय ? ताईसाहेब बाईमाणूस म्हणून त्या निर्भय आहेत. देवा, मलासुद्धां यावेळीं रामाची सीता करशील तर मी तुझ्या नांवानं एक पैशाच्या रेवड्या वांटीन ! (विसाजी येतो.)

विसाजी : जडजवाहीर कानटोपींत दडवून ठेवलं आन् वचनचिठ्या व कर्जरोखे पोटाशीं बांधून टाकले ! आतां त्या वाऱ्याला म्हणावं ये चोरा ! (पडद्यांत जयघोष, वाद्यध्वनी वगैरे होतात.) अरे बापरे ! आलाच वाटतं ! हें बघ रामा, आतां या गादींत गुंडाळून मला इथं कोपऱ्यांत उभा कर !

रामा : आन् धनीसाहेब, माझी वाट ?

विसाजी : तुला बारा वाटा मोकळ्या आहेत ! तूं गोठ्यांतल्या गवाणींत लपून बैस.

रामा : तुम्ही श्रीमंत सावकार म्हणून गादींत दडणार, आन् मी गरीब म्हणून गोठ्यांत लपायचं काय ?

विसाजी : चल, आटप लवकर. तो चांडाळ आतां इतक्यांत येईल ! चल, गुंडाळ मला गादींत. पण जरा जपून. नाहींतर तिरडी आवळतात तसा मला आवळून अर्धामेला करशील ! (रामा त्याला गादींत गुंडाळून कोपऱ्यांत गादी उभी करून ठेवतो व त्याच्या तोंडावर पाय पुसण्याचं गोणपाट घालतो.) शीः ! ही कसली घाण माझ्या तोंडावर टाकलीस ?

रामा : गप बसा. नाहींतर सगळं बेंड बाहेर फोडीन ! दरोडेखोर महाराजांची स्वारी कुठवर आली तें जरा डोकावून येतो. (जातो.)

विसाजी : (व्हिक्टोरिया राणीच्या तसबिरीस हात जोडून) आईसाहेब, आतां माझी लाज, माझी दौलत आन् माझे प्राण तुमच्यावांचून कोण राखणार? शिवाजीला अंबभवानीनं जसं संकटकालीं साहाय्य केलं, त्याप्रमाणं तुम्ही या तुमच्या भक्ताच्या रक्षणाला यावेळीं धावून नाहीं का येणार?

(पडद्यांत रामा—' नाहीं नाहीं. मी तुम्हांला आंत येऊं देणार नाहीं. ' रामाला गचांडी मारीत विनायक व त्याच्यामागून **वासुदेव बळवंत** आणि हातांत कुऱ्हाडी, भाले, पलिते घेऊन रामोशी येतात.)

विनायक : हरामखोरा, कुणाला प्रतिबंध करतोस? तुझ्या बापाला?

रामा : तसं नाहीं हो. तुम्ही कुणाच्या हुकमानं आमच्या वाड्यांत घुसलांत असं मी भीत भीत विचारतोंय यांना!

वासुदेव : आम्ही कुणाच्या हुकमानं वाड्यांत आलों होय?

रामा : होय. हा माझा आपला गरिबीचा सवाल आहे.

वासुदेव : आम्ही शिवाजी महाराजांच्या हुकमानं या वाड्यांत शिरलों. आम्ही स्वराज्याचे सेवक आहोंत. स्वातंत्र्यार्थ प्राणार्पण करणारे सैनिक तयार करून, त्यांच्या बळावर टोपीवाल्या इंग्रजांना देशांतून हुसकून लावण्याचा आमचा विचार आहे. पण तूं कोण? या वाड्याचा तूं मालक आहेस?

रामा : तूर्त नाहीं. पण पुढंमागं होण्याचा संभव आहे!

विनायक : काय रे रामा, बाबा कुठं आहेत?

रामा : धनीसाहेब–आमचे धनीसाहेब–आटपले हो! (गळा काढून रडतो.)

विनायक : लबाड बोलशील तर पाठीची चामडी लोळवीन!

रामा : मग बघा, कुठं दडून बसले आहेत कीं काय तें!

वासुदेव : दौल्या, खौल्या, सर्व वाडा धुंडाळून ज्या मौल्यवान् चीजा हातीं लागतील त्या गोळा करून आणा. मात्र तान्ह्या अर्भकाच्या, आसन्न-मरण रोग्याच्या आणि मायमाउलीच्या केसालाही धक्का लावायचा नाहीं हें ध्यानांत ठेवा. (दौल्या, खौल्या आंत जातात.)

रामा : यावेळीं देवानं मला रांगतं बाळ केलं असतं तर काय बहार होती!

वासुदेव : त्या तिजोरीची किल्ली कुणाजवळ आहे रे?

रामा : धनीसाहेबांजवळ होती. पण त्यांच्या देहाबरोबरच्च तीही जळून गेली!

वासुदेव : विनायक, घणाचे घाव घालून ती तिजोरी फोडून टाक. सावकारांच्या तिजोरींत अडकून पडलेली, गरिबांची हक्काची दौलत बाहेर काढून, ती मला गोरगरिबांच्या कल्याणासाठीं खर्च करायची आहे. (विनायक आंत जाऊन थोड्या वेळानं नुसते कांहीं जुने कागद घेऊन येतो.)

विनायक : महाराज, तिजोरी खुलीच होती आणि त्यांत हे जुनेपुराणे निरुपयोगी कागद काय ते सांपडले.

वासुदेव : नुसते कागदच ?

विनायक : होय. या मुदतीबाहेर गेलेल्या वचनचिठ्या आणि निकालांत निघालेल्या दाव्यांचे कागदांची नुसती रद्दी आहे झालं !

वासुदेव : एकसुद्धां मौल्यवान् दागिना नाहीं तिजोरींत ?

विनायक : नाहीं महाराज. आज लक्ष्मीपूजनासाठीं बाबांनीं सर्व संपत्ती नुकतीच तिजोरींतून काढून देवघरांत नेली होती.

वासुदेव : तर मग जा. देवघरांत कुठं दडवून ठेवली आहे कीं काय तें पहा पाहूं! आन् सावकाराचाही शोध कर. कुठं दडून बसला आहे बेरड ! (विनायक जातो. दौल्याखौल्या बाहेर येतात.)

दौल्या : महाराज, सर्व वाड्याचा कोपरान् कोपरा आम्हीं धुंडाळला. पण मौल्यवान् चीज किंवा तो सावकार आम्हांला आढळला नाहीं. हां, वरच्या सज्जांत एक आवा मात्र बसलेली दिसली आम्हास्नी!

वासुदेव : पण त्या माउलीला तुम्हीं कांहीं त्रास दिला नाहीं ना ?

दौल्या : छे धनीसाब. आम्हीं तिच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाहीं.

रामा : (स्वगत) ढुंकूनही पाहिलं नाहीं? मग ती आवा आहे हें कसं कळलं बेट्याला ! (विनायक येतो.)

विनायक : महाराज, देवघरांतही जडजवाहीर किंवा आमचे बाबा यांचा कांहींच ठावठिकाणा लागला नाहीं.

वासुदेव : एवढ्या मोठ्या सावकाराच्या वाड्यांत एक देखील मौल्यवान् चीज मिळूं नये. मोठं नवल आहे!

रामा : अहो त्यांत नवल कसलं. मोठं तितकं समदं खोटं !

वासुदेव : खात्रीनं यांत कांहीं तरी लबाडी आहे. आम्हांला चकविण्यासाठीं त्या बिलंदर सावकारानं संपत्तीसकट कुठंतरी दडी मारली आहे खास! दौल्या खौल्या, जा. सगळा वाडा खणून काढा. भिंती, वहालं, फडताळं मोडून तोडून संपत्तीचा सांठा हुडकून काढा; आणि इतकं करूनही संपत्तीचा शोध लागला नाहीं, तर शेवटीं हातांतल्या पलित्यांनीं साऱ्या वाड्याला आग लावून, हा चिरेबंदी वाड बेचिराख करून टाका. दिवाळींत होऊन जाऊं दे होळीचा सण साजरा!

विसाजी : अग आईग! चावला, कडकडून चावला!

विनायक : चावला? त्या कोपऱ्यांतून आवाज आला. पाहूं या काय आहे तें!

रामा : काय पहायचं त्यांत? ती धनीसाहेबांची निजायची गादी उभी करून ठेवली आहे मी त्या कोपऱ्यांत!

वासुदेव : त्यांतच सावकार दडून बसला असला पाहिजे.

रामा : अहो, गादींत ढेकूण सांपडायचा; सावकार कुठून सांपडायला? (वासुदेव धांवत जाऊन गादीवरचं गोणपाट बाजूला करतो.)

वासुदेव : हा पहा ढेकूण! गरिबांचं रक्त खाऊन पुष्ट बनलेला हा सावकाररूपी ढेकूण! हरामखोरा, चल असा बाहेर ये.

विसाजी : राम्या, शुंभासारखा उभा काय राहिला आहेस? गादी जशी आवळलीस तशी आतां सोडशील कीं नाहीं?

रामा : पगार नाहीं मिळाला तरी कामांत कुचराई व्हायची नाहीं; (गादीची दोरी सोडूं लागतो.) पण धनीसाहेब, जरा कळ काढली असतीत तर? त्यांनीं वाड्याची होळी करतो म्हणतांच तुम्हीं बोंब ठोकलीत?

विसाजी : पायाला विंचू चावला त्याला काय करणार!

रामा : विंचू? कुठं आहे?

विसाजी : चावला आन् निघून गेला. आपलं काम झाल्यावर तो कशाला राहतो मरायला!

रामा : सांपडता तर वाहणेखालीं चेंचला असता.

वासुदेव : या सावकार! गादींत घोड्याप्रमाणं उभ्यानं झोंप घेत होतात वाटतं?

विसाजी : त्या विंचवानं सगळा घोटाळा केलान्.

वासुदेव : पण त्यानंच दडलेल्या चोराचा सुगावा दिलान्. कधीं कधीं वाईटांतून चांगलं निघतं म्हणतात तें हें असं ! बरं तें जाऊं दे. चल, तुझ्या-जवळचं सर्व जवाहीर अगोदर आमच्यापुढं हजर कर.

विसाजी : तुम्ही वाड्याचा कोपरान्‌कोपरा धुंडाळून पाहिलात ना ? मग कांहीं हातीं लागलं का ? नाहीं ना ? मग माझ्यासारख्या गरिबाला छळून तूं कां बरं विनाकारण नरकांत पडतोस ?

वासुदेव : तूं गरीब नसून गोरगरिबांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, खोट्या दस्तऐवजाच्या बळावर शेतकऱ्यांच्या जमिनी आणि घरंदारं घशांत लोटणारा संभावित गळेकापू आहेस ! प्रतिष्ठित दरोडेखोर आहेस तूं !'

विसाजी : पण एका दरोडेखोरानं दुसऱ्या दरोडेखोरावर आग पाखडण्यांत काय अर्थ आहे ?

वासुदेव : चूप रहा. तुझी माझी योग्यता एक समजतोस कीं काय ? रंग सारखा म्हणून बगळा आणि राजहंस एक समजणं महामूर्खपणाचं आहे. गोरगरिबांच्या शाश्वत कल्याणासाठीं स्वातंत्र्याची आवश्यकता आहे--आणि तेवढ्यासाठीं, बंडाचा झेंडा फडकावून, गोरेशाही नष्ट करून, त्या ठिकाणीं आम्ही सर्वमंगल शिवशाही सुरू करणार आहोंत. पण गाढवापुढं गीता वाचून त्याचा काय उपयोग ? चल, सारं जडजवाहीर आणि गहाणखतं, कर्जरोखे पुढं आणून हजर कर.

विसाजी : कर्जरोखे जाळून टाकले हो !

रामा : आन् गहाणखतांचं खत घातलं हो शेताला !

वासुदेव : लबाड बोलशील तर लाथेनं पेकाट मोडून टाकीन. सावकार, मुकाट्यानं द्रव्याचा निधि आमच्या स्वाधीन कर. पण तुम्ही तसे नाहीं ऐकायचेत ! दौल्या खौल्या, दोन पलिते पेटवून आणा, आणि या दोन बदमाषांना जिवंत जाळून टाका !

विसाजी : अग आईग !

रामा : अरे बापरे !

विसाजी : विन्या विन्या, तुला तरी बापाची कांहीं दयामाया !

विनायक : तुमच्या जवळची माया आमच्या स्वाधीन करा म्हणजे आमचे महाराज तुमच्यावर दया खात्रीनं करतील.

वासुदेव : आम्हांला पाहिजे असलेलं द्रव्य आम्हांला मिळण्याशीं कारण. पैका हातीं पडल्यावर आम्ही कुणाच्या केंसालाही धक्का लावणार नाहीं.

विसाजी : (स्वगत) पण केंसाला धक्का लावल्याशिवाय पैका कसा हातीं येणार ? आतां मी काय करूं ? कांचनाचा बचाव करूं कीं कातडीचा ?

वासुदेव : दौल्या, तूं या सावकाराला भडाग्नि दे. आणि खौल्या, तूं या रामाची लंका करून टाक.

रामा : (स्वगत) पूर्वीं रामसेवक मारुतीनं लंका जाळली. पण हा रामोशी खौल्या खुद्द रामालाच जाळणार !

विसाजी : अरे रामा—

रामा : जळ्ळा तुमचा राम !

वासुदेव : दौल्याखौल्या, पाहतां काय ? पेटवा दोघांना एकदम ! (दौल्या-खौल्या दोन पलिते पेटवून दोघाच्या जवळ जाऊन उभे राहतात.) सावकाराला डोक्यापासून आणि याला पायापासून पेटवा. विनायक, त्याची ती कानटोपी काढ पाहूं !

विसाजी : हां खबरदार कानटोपीला हात लावशील तर ! कानशील रंगवून टाकीन.

वासुदेव : खात्रीनं सांगतों त्या कानटोपींतच धनदौलत आहे. सावकारांनीं आम्हांला फसविण्यासाठीं, कानटोपीची कामचलाऊ तिजोरी केलेली दिसते ! ओढ ती टोपी. (विनायक टोपी ओढूं लागतो. विसाजी त्याला हरकत करीत असतो. दौल्या पलिता त्याच्या तोंडाजवळ नेतो.)

विसाजी : ओय ओय ! मेलों मेलों ! जळ्ळं माझं तोंड. हां घ्या. घाला तुमच्या मढ्यावर ! (जोरानं टोपी काढून त्यांच्यापुढं फेकतो.)

वासुदेव : वाहवा ! खूप लूट मिळाली, आजचं लक्ष्मीपूजन सायसंगीत साजरं झालं ! बरं सावकार, आतां कागद कुठं आहेत तेवढे स्वाधीन करा पाहूं. म्हणजे आम्ही चाललों आमच्या मुक्कामावर ! आणा, कर्जरोखे, गहाणखतं सारे कागद आणा जलदी.

विसाजी : एवढं डबोलं गावलं, आन् आतां कागद घेऊन काय चाटायचे आहेत ?

वासुदेव : हो हो, चाटायचे आहेत. सावकाराकडच्या कांचनापेक्षां कागद अधिक घातुक असतात. सावकारांचे कर्जरोखे म्हणजे शेतकऱ्यांची पिळणूक करणारे चरक होत. चल, काढ लवकर कागद !

विसाजी : प्राण गेल्यावर या मढ्याला उराशीं कवटाळून धरण्यांत काय हंशील आहे ? हां, हे घ्या कागद. (कागद काढून फेकतो त्यांच्यापुढं. विनायक ते गोळा करून वासुदेवाजवळ देतो.)

वासुदेव : हे कागद या द्रव्याहून अधिक किंमतीचे आहेत.

रामा : आणि म्हणूनच द्रव्य डोक्यावर तर हे कागद धनीसाहेबांनीं आपल्या उराशीं कवटाळून धरले होते !

वासुदेव : विनायक, दौल्या, खौल्या, ही लूट घेऊन चला आपल्या मुक्कामावर. (विनायक वगैरे जातात.) आज खूप लूट मिळाली. आतां इंग्रजांची जुलमी सत्ता उलथून पाडायला कितीसा वेळ लागणार आहे ! सावकार येतों. या वासुदेव बळवंताची आठवण ठेवा. (तो जाऊं लागतो, तोंच सय्यद अबदुल हक्क येऊन त्याला पिस्तुल रोखून मार्गातच अडवतो. त्याच्याबरोबर दोन शिपाई असतात.)

अबदुल : चाललास कुठं ? तिथंच उभा रहा.

वासुदेव : या वासुदेव बळवंताला असा हुकूम करणारा तूं कोण ?

अबदुल : मी कोण ?

वासुदेव : हो हो, हा शिवाजी महाराजांचा नवा पंतप्रधान तुला विचारतोय्, मला अडवणारा तूं कोण तिरशिंगराव ?

अबदुल : तुझ्या बंडाचा बींमोड करण्यासाठीं, मेजर डॅनियलसाहेबांच्या दिमतीला निजामसाहेबांनीं धाडलेला, मी पोलिस कमिशनर रायबहादुर सय्यद अबदुल हक्क आहे समजलास.

वासुदेव : अस्सं अस्सं. म्हणजे तूं दोन्ही घरचे तुकडे खाणारा लांडा कुत्रा आहेस म्हणायचा !

अबदुल : खामोष !

वासुदेव : माझ्या भयानं पुण्या मुंबईच्या टोपीवाल्यांची गाळण उडाली, तेव्हां आतां हा दाढीवाला बोकड माझ्या बंदोबस्तासाठीं आला आहे! नव्हे, माझ्या तरवारीला बळी पडण्यासाठींच आला आहे.

विसाजी : काय बेट्याचं धाडस! दरोडे घालतो तो घालतोच, पण वर एवढ्या मोठ्या सरकारी हुद्देदाराला बेडरपणानं प्रत्युत्तरं देतोय!

अबदुल : वासुदेव बळवंत, तूं बंडखोर—दरोडेखोर आहेस!

वासुदेव : होय होय. आमच्या शिवाजी महाराजांना त्यांचे शत्रु आरंभीं असंच म्हणत होते. पण तेच पुढं महाराष्ट्राचे छत्रपति झाले! आणि पहाडी चुव्वा म्हणून ज्यांनीं त्यांची हेटाळणी केली, त्या मोगलांना त्या चुव्यानं तोबातोबा करायला लावल हें आपल्याला माहीत असेलच!

अबदुल : अँ:! मोगलांच्या मऊ धोरणामुळं त्या शैतान शिवाजीची फत्ते झाली. म्हणून प्रबल इंग्रजांसमोर तुझी बेताकद झुंज यशस्वी होईल असं बिलकुल समजूं नकोस. चार भुरटे रामोशी गोळा केले—

विसाजी : आणि आमच्यासारख्या दयाळू सावकारांना लुबाडलं—

अबदुल : म्हणजे इंग्रज इथून पळून जातील ही तुझी कल्पना केवळ पागलपणाची आहे. दयाळू मायबाप सरकारचं राज्य म्हणजे अल्लाची खैर म्हणायची!

विसाजी : केवळ परमेश्वरी कृपेनंच राणीच्या राज्याचा आम्हांला लाभ झाला आहे. तेंच नष्ट करण्याची वासना धरणं म्हणजे स्वतांसकट सर्व देशाचा नाश करणं होय.

अबदुल : सत्तावनच्या बंडाचा परिणाम काय झाला? चार दिवस हुल्लड केली, पांचपन्नास गोरे कापले, मारे स्वातंत्र्याचे झेंडे नाचवले!

विसाजी : पण इंग्रजांच्या कवायती फौजेनं ससेहोलपट करतांच, बंडाचे पुढारी बेपत्ता झाले; आणि गोरगरिब मात्र नाहक भरडले गेले!

अबदुल : वासुदेव बळवंत, तुम्ही सुशिक्षित आहांत. पूर्वीच्या इतिहासानं तुम्हीं शहाणे बनून हा बंडाचा पागलपणा करायला नको होता.

वासुदेव : मी पागल आहे खराच! आणि सर्व देश माझ्यासारखाच पागल बनावा हीच माझी इच्छा आहे. प्रजेचं कल्याण, गोरगरिबांचा कळवळा ही मोहक भाषा आणि साळसूदपणा, हिंदुस्थानच्या भोळसर माणसांना

फसवायला ठीक आहेत. या लुच्च्या सावकाराप्रमाणं किंवा ढोंगी टोपीवाल्याप्रमाणं, गरिबांच्या कल्याणाची गुळचट भाषा बोलून, त्यांच्या काळजांतलं रक्त घटाघटा पिण्याचा अधमपणा हा वासुदेव बळवंत कधींही करणार नाहीं. अन्नान्नदशा झालेल्या असंख्य शेतकऱ्यांच्या आंतड्यांना पडणारा पीळ, आणि त्यांच्या काळजाला बसणारे दारिद्र्याचे चटके, धनलोभानं धुन्द झालेल्या या सावकारांना किंवा सत्तामदानं बेफाम बनलेल्या सरकारला कसे दिसणार ? हा वासुदेव स्वत: गरीब आहे. दारिद्र्याच्या यातना त्यानं स्वतः अनुभवल्या आहेत. कंगाल प्रजेच्या करपलेल्या काळजाची मला कदर वाटते. आणि म्हणूनच बंडाच्याद्वारें, जनतेचं दुखणं वेशीवर टांगून, परकीय जुलमी सत्तेचं उच्चाटन करण्याचा मीं संकल्प केला आहे.

अबदुल : आणि तुझ्या बंडाचा समूळ नायनाट करण्याचा ,या बहाद्दर अबदुलनं निर्धार केला आहे. तेव्हां मुकाट्यानं आमच्या स्वाधीन हो.

विसाजी : आणि साहेबबहाद्दरांच्या पायांवर लोळण घेऊन, कृतापराधाची क्षमा माग.

वासुदेव : अरे, ज्या वासुदेव बळवंतानं आतांपर्यंत सतरा वेळां तुमच्या हातावर तुरी देऊन भरारी मारली, तो असा सहजासहजीं तुझ्या स्वाधीन होईल काय ? दारांतल्या कुत्र्याला लाथ मारून बाजूला करून, हा पठ्ठ्या फरारी होत असतो, समजलास ! छाती असेल तर मला अडव !

अबदुल : खबरदार पुढं येशील तर ! पिस्तुल झाडून तुला इथल्या इथं ठार करून टाकीन ! शिपायांनो, चढवा बेड्या याच्या हातांत !

विसाजी : चढवा बेड्या हरामखोराच्या हातांत !

वासुदेव : काय करणार ? एकटा तुमच्या कचाट्यांत सांपडलों खरा ! या बुवा; चढवा माझ्या हातांत बेड्या. (शिपाई बेड्या घालायला पुढं येतात. त्या दोघांची मानगुटी पकडून दोघांचीं डोकीं एकमेकांवर घांसतो; आणि त्यांना दोन बाजूस फेकून देतो.) याच्या हातांत पिस्तुल आहे म्हणून; नाहींतर यालाही कोंबडीसारखा पिळून टाकला असता ! आतां काय चरं

युक्ति करावी! (पडद्यांत-सावित्री-"मर्द पुरुषा, घाबरूं नको. तुझ्या साहाय्या-साठीं ही सावित्री आली पहा." हातांत पिस्तुल घेऊन सावित्री धांवत येते.)

सावित्री : (अबदुल्ला) मुकाट्यानं पिस्तुल मागं घ्या. नाहींतर माझ्या हातांतल्या पिस्तुलानं, तुझ्या हातांतलं पिस्तुल हातासकट अस्मानांत उडेल!

अबदुल : ओहो! कितनी खूपसूरत और शेर दिल औरत है!

विसाजी : सावित्री, तूं बाजूला हो. सरकारी कामांत तूं विनाकारण अडथळा करूं नकोस!

अबदुल : ये छोकरी की दिलचस्प खूपसूरती देखतेही, मेरे कलेजेमें कुछ गडबड होने लगी है!

विसाजी : अग कार्टे, बाजूला हो. ते वरिष्ठ अधिकारी आहेत, आन् त्यांच्यावर तूं पिस्तुल रोखतेस? पण हें घातुक हत्यार तुला कुठं सांपडलं ग?

सावित्री : मला देवानं दिलं!

विसाजी : अरेच्या! गोऱ्या लोकांप्रमाणं देवही हा शस्त्रांचा व्यापार करूं लागले कीं काय?

सावित्री : शिवाजी महाराजांना अंबाभवानीनं तरवार दिली नव्हती का?

विसाजी : अँ:! त्या केवळ भाकडकथा होत. कोण प्रत्यक्ष पहायला गेला आहे? पण तूं बाजूला हो कशी. त्या वाऱ्याचा कांटा परस्पर निघतोय. त्यांत तूं कशाला फांदा घालतेस! कुत्ता जाने चमडा जाने!

सावित्री : आपल्या घरीं आलेल्या या थोर देशभक्ताला, संकटांतून सोडवणं हें माझं कर्तव्य आहे.

विसाजी : फाजीलपणा पुरे कर. आणि एकीकडे हो पाहूं. पण तूं तशी ऐकायची नाहींस. तुला अश्शी बाजूला केल्याशिवाय—(तिच्या दंडाला धरून बाजूला सरकतो.)

सावित्री : बाबा, मला अटकाव करूं नका. नाहींतर पिस्तुलाचा मोर्चा मला तुमच्याकडे वळवावा लागेल.

विसाजी : मग नको रे बाबा! (भीतीनं मागं सरतो.) तुम्हीच मारा आन् मरा!

सावित्री : साहेबबहाद्दूर, मुकाट्यानं पिस्तुल मागं घेऊन, या थोर पुरुषाचा मार्ग मोकळा करा; आणि अधिकाराच्या बळावर अतिप्रसंग करण्याचाच तुमचा मनसुबा असेल, तर मीही तुम्हांला बजावून सांगतें, या स्वातंत्र्य-वीराच्या केंसाला धक्का लागतांच, या पिस्तुलांतल्या गोळीनं इथल्या इथं तूं ठार झालासच म्हणून समज !

अबदुल : झालों. ठार झालों ! या हिंदु छोकरीच्या डोळ्यांतल्या दोन भेदक गोळ्यांनीं, हा पोलिस कमिशनर अबदुल हक्क ठार झाला ! (तो हतबल झालेला पाहून वासुदेव चपळाईनं त्याच्या हातांतलं पिस्तुल काढून घेतो.)

वासुदेव : हत् षंढा ! मला पकडायला मिशीवर पीळ भरून आलास, आन् या मर्दानी मुलीला पहातांच, नामर्द बायल्या बनलास ! थूः तुझ्या जिनगानीवर ! माय माझे, तुझ्या ऋणाची फेड हा वासुदेव केल्याशिवाय राहणार नाहीं. (तिच्या पायां पडतो.)

सावित्री : तुमच्या खटपटीनं भारत स्वतंत्र झाला म्हणजे माझ्या ऋणाची फेड आपसुकच होईल.

वासुदेव : माझ्या मायभगिनींचे आशीर्वाद फळाला आल्याशिवाय खात्रीनं राहणार नाहींत. साहेबबहादूर ! पुन्हा या वासुदेव बळवंताच्या वाटेला जाण्याची धिटाई करूं नका. येतो रामराम. सावकार रामराम ! (झटकन् जातो.)

विसाजी : अरे त्याला पकडा. तो चालला, पळाला, निसटला ! [अबदुल हतबुद्ध होऊन त्याच्याकडे पहात राहतो. सावित्री हर्षनिर्भर नेत्रांनीं जाणाऱ्या वासुदेव बळवंतकडे पहात असते. आन् सावकार विसाजी अबदुलकडे उपहासानं व तुच्छतेच्या नजरेनं पहात राहतो.]

(पडदा पडतो.)

अंक १ ला समाप्त

२

प्रवेश पहिला

[स्थळ-पुणें डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिन्टेंडेंटचें ऑफिस, पोलिस सुपरिन्टेंडेंट मेजर डॅनिअलसाहेब, कागदपत्र चाळीत बसले आहेत. चपराशाच्या वेशांत रामा शेजारीं उभा आहे.]

डॅनिअल : चपराशी !

रामा : जी साब.

डॅनिअल : हे कागद पोलिस कमिशनर अबदुल हक याणा णेऊण डे. ॲन्ड मी त्यांणा इकडे बोलावले आहे म्हणूण त्याणा सांग.

रामा : जी साब. (सलाम करून निघून जातो.)

डॅनिअल : वासुडेव बळवंट ! बडा नटोरियस मॅन—नो—नो—व्हेरी डेंजरस डेव्हिल हाय. त्याचा बंडोबस्ट कशा करायचा हेंच आम्हाला समजट नाय ! आज पूणा प्रांटांट, टर उड्या साटाऱ्यांट अशा वाऱ्याच्या वेगाण तो द्दावतो आहे. ॲन्ड आम्हाला हैराण करटो हाय. घाटमाथ्यावर आम्ही ठिकठिकाणीं, त्याला पकडण्यासाठीं चौकी पहाऱ्याचा बंडोबस्ट केला. टवा आटा टो खालीं घाट उतरूण कोंकणांट गेला असल्याची आम्हाला खबर मिळटांच, त्याला पकडण्यासाठीं, आम्ही निजामसाहेबाकडून मागूण घेतलेले पोलीस कमिशणर सय्यद अबदुल हक याणा रवाणा केले. टे नुकटेच टिकडूण परट आले आहेट. [अबदुल येऊन सलाम करतो.] हकसाहेब, टुमच्या कामगिरीच्यं काय झालं ?

अबदुल : साहेब, आम्ही हुकमाप्रमाणें पळस्पा येथें गेलों. गांवांत शिरण्याच्या वाटा आणि मोक्याचीं ठिकाणं यांच्यावर सशस्त्र शिपाई ठेवून मी स्वतः गांवांत गेलों. पण आम्हीं तिथं जाण्यापूर्वीच लुटारूंची टोळी, श्रीमंतांचीं घरं लुटून फरारी झाली होती.

डॅनिअल : टर मग, वासुडेव बळवंट टूमाला सांपडला नाय ?

अबदुल : नाहीं साहेब. त्या दरोडेखोरांचे हेर मोठे हुषार दिसतात. आम्हीं कितीही सावधगिरी बाळगली तरी त्यांना आमचा सुगावा अचुक लागतो. आन् आपली कामगिरी फत्ते करून ते एक फरारी तरी होतात किंवा स्थलांतर तरी करतात !

डॅनिअल : पण ट्याचा पिच्छा सोडूं नका. टूमाला, शस्त्रास्त्रं, डारूगोळा, शिपाई, जी जी मडट लागेल टी घ्या. पण कशेही करूण, वासुडेव बळवंटला पकडूण आणा.

अबदुल : त्याचा एखादा हस्तक जर फितूर करायला सांपडला तर काय बहार होईल. त्याच्याकडून त्या बदमाशाचा शोध आम्हांला खात्रीनं मिळवतां येईल.

डॅनिअल : मग टशा एखाडा हस्टक हुडकूण काढा. बक्षिशाची ट्याला लालूच डाखवा.

अबदुल : आपण हजार रुपयांचं बक्षीस जाहीर केलेलंच आहे.

डॅनिअल : आणखी हजार रुपये वाढवूं. टूमी पैशाची फिकीर मुळींच करूं णका. कमिशणरसाहेब, वासुडेव बळवंटाला आमाला पकडटा आलं नाय, टर टी आमच्या ऑफिसला अँड पोलीस डिपार्टमेंटला णामुष्कीची गोष्ट होणार हाय. कामांट कसुर किंवा हयगय न करटा हुषारीणं कामगिरी पार पाडा. "वुइ आर ऑल फेतफूल अँड ओबिडियंट गव्हर्मेंट सर्वंट्स्" हें ध्यानांत ठेवा, जा. (तो सलाम करून निघून जातो.) ट्याच्या साठीडारा-पैकीं कोणीटरी फिटूर झाला, टरच वासुडेव बळवंट आमच्या हाटीं मिळणार ! बाकी असा एखाडा फिटूर या डेशांत मिळणं इम्पॉसिबल नाय. चपराशी— (रामा येतो.)

रामा : जी साब !

डॅनिअल : बाहेर विसाजीपंट सावकार असटील, ट्याणा बोलाव.

रामा : जी साब. (रामा जातो.)

डॅनिअल : या विसाजी सावकाराचा पोर विनायक ट्या बंडखोराच्या टोळींट असटो असं आम्हाला समजलं हाय. (विसाजी येतो.) या सावकार.

विसाजी : कसले सावकार, साहेब? जहागीर नसलेले जसे जहागीरदार तसे कवडी नसलेले आम्ही कफल्लक सावकार आहोंत! साहेब, माझी फिर्याद आहे तुमच्याकडे.

डॅनिअल : फिर्याद? कुणाच्याविरुद्द टूमची फिर्याड हाय?

विसाजी : साहेब, तुम्ही राज्याचा बंदोबस्त करता का चेष्टा करता?

डॅनिअल : क्या हुवा?

विसाजी : क्या हुवा? आम्ही सपशेल नागवलों गेलों तरी क्या हुवाच का? बरोबर आहे. तो वासुदेव जेव्हां सरकारी खजिन्यावर दरोडा घालील तेव्हां तुम्ही शुद्धीवर याल!

डॅनिअल : त्या वासुडेव बळवंटानें टूमच्या वाड्यावर डरोडा घातला. टूमची सारी डौलट त्या डरोडेखोराण लुटून णेली? सॉरी!

विसाजी : नुसतं सारी म्हणून अंगावरची सारी जबाबदारी उडवून लावण्याची ही साहेबी तऱ्हा मला माहीत आहे. साहेब, मलासुद्धां तुमच्या कारभाराविषयीं अलीकडे असा चेव येऊं लागला आहे—

डॅनिअल : शांट व्हा, शांट व्हा; सावकार, तुमची फिर्याड काय हाय?

विसाजी : साहेब, ऐका. ऐन लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं, त्या बंडखोर वासुदेव बळवंतानं आमच्या वाड्यावर दरोडा घालून सर्व मौल्यवान् चिजा, जडजवाहीर, माणिकमोतीं मिळून लक्षावधि रुपयांची माझी दौलत त्यानं लुटून नेली! साहेब, काय सांगूं, वाडवडलांनीं अहोरात्र कष्ट करून (कपाळावरचा घाम हातानं झटकून) अस्सा घाम गाळून, कवडी कवडी करून जमवलेली आणि आम्हीं जिवापाड जतन केलेली लक्ष्मी; अगदीं लक्ष्मीपूजनाचे रात्रीं त्या फडक्यांच्या नरकासुरानं हरण करून नेली!

डॅनिअल : ह्याबद्दल टूमी बिलकूल वाइट वाटून घेऊं णका! आकाशाटील प्रभू टूमची दणडौलट टूमाला परट डेइल! डोन्ट वरी!

विसाजी : त्याची वरी मला वाटत नाहीं. तसेंच दरोडा पडला याबद्दल मला तसं विशेष वाईट वाटत नाहीं आणि आश्चर्यही वाटत नाहीं. कारण गांव आहे तिथं म्हारवडा त्याप्रमाणं श्रीमंत आहेत तिथं दरोडा हा

पडायचाच ! मला मुख्य चीड आली, ती तो कोण हैद्राबादी पोलिस अधिकारी तुम्हीं पाठवला होतात, तो अबदुल की गबदुल ! त्याची.

डॅनिअल : टे हैद्राबाद स्टेटचे पोलीस कमिशणर आहेत. त्यांना वासुडेव बळवंटाच्या बंडोबस्टासाठीं, आमी मुड्डाम मागूण घेटले हाय.

विसाजी : अहो तो पोलिस कमिशनर कसला आला आहे. तो तर हिंदु पोरींच्या मागं लागणारा एक उल्लू का पठ्ठा आहे झालं !

डॅनिअल : खामोष ! हमारे अफसरोंके खिलाफ बात करना फौरन बंद करो. नहीं तो जबान काट डालूंगा !

विसाजी : साहेब, असल्या दरडावणीला मी भिणार नाहीं. मी कांहीं ही बाजारगप्प किंवा कल्पित कथा सांगत नाहीं. तर प्रत्यक्ष माझ्या मुलीबाबत माझ्या नजरेसमोर घडलेली सत्यकथा सांगतों आहें.

डॅनिअल : ऐशा ! डेन सब हकीकट साफ साफ सांगा पाहूं !

विसाजी : अबदुल्यासारखे बैदुल अधिकारी शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठीं तुम्ही नेमूं लागलांत, तर एकच काय, घरोघर वासुदेव बळवंत निर्माण होतील आणि मग राणीचं राज्य तात्काळ नष्ट होईल साहेब.

डॅनिअल : नॉनसेन्स ! टूमी काय म्हणटा ढ्याणांट आलं नाय. काय भाणगड झाली टूमच्या वाड्यांट ? शांटपणाणं समडी हकीकट सांगा.

विसाजी : हें पहा साहेब, ऐन लक्ष्मीपूजनाच्या रात्रीं वासुदेव बळवंताचा छापा आमच्या वाड्यावर पडला हें मीं आतां सांगितलंच. आम्हीं प्रतिकाराची शिकस्त केली. इतक्यांत हे तुमचे अबदुलसाहेब येऊन पोंचले. आरंभीं त्यांनीं बरीच गुरगुर केली. वासुदेव बळवंताला जरब देऊन गिरफ्दार करण्याचाही त्यांनीं चंग बांधला.

डॅनिअल : बरं, पुढं काय झालं ?

विसाजी : आम्हांला त्यांचा रुबाब पाहून आरंभीं मोठा धीर आला. म्हटलं आहे; हें हैद्राबादी पाणी कांहीं और आहे. पण पुढं काय ? आमची मुलगी सावित्री तिथं आलेली पहातांच, मेनकेला पहातांच विश्वामित्राचं जसं तपोबल ढळलं, तसाच अबदुल साहेबांचा पोलीशी बाणा खाड्‌दिशीं लटपटला ! आणि तें हैद्राबादचं पाणी, निव्वळ कुत्र्याचं मूत ठरलं !

डॅनिअल : हें समदं टूमी खरं सांगटा ?

विसाजी : आम्ही सावकार कुळाशीं खोटेपणा करीत असलों, तरी साहेब, आपल्या पायांपाशीं, एका बड्या पोलिस अंमलदाराविरुद्ध खोटी चुगली कशी करूं बरं ?

डॅनिअल : हें खरं अशेल ? हकसाहेब एवढे मॅड अफ्टर लव्ह बनले असटील ? या हैद्राबाडी जवानांचा कांहीं णेम णाहीं.

विसाजी : माझ्या पोरीच्या रूपाला अबदुल साहेब भाळले आणि त्यांनीं हातीं सांपडलेली वासुदेव बळवंताची शिकार गमावली.

डॅनिअल : (टेबलावरची घंटा वाजवतात) चपरासी–(रामा येतो.)

रामा : जी साब.

डॅनिअल : अबदुलसाहेबांणा बोलावून आण. (रामा जातो.) सावकार, टूमी आटा सांगिटलेली हकीकट अबदुल साहेबांच्या समोर पूराव्याणिशी पटवली पाहिजे.

विसाजी : मग मी डरेन कीं काय ?

डॅनिअल : जर पुरावा पटला नाय, अँड टूमचीच बडमाशी डिसून आली तर टूमाला जबर शिक्षा भोगावी लागेल ! माइंड वेल ! (अबदुल येतो. सावकाराला समोर पहातांच त्याचा चेहरा कावराबावरा होतो. डॅनिअल बारकाईनं त्याच्या चेहऱ्याकडे पहातो.) हक साहेब, याणा टूमी ओळखटा ?

अबदुल : होय साहेब. हे पळस्प्याचे, वासुदेव बळवंताचे साथीदार असलेले, विसाजीपंत सावकार !

विसाजी : (स्व.) त्या वाघाचा मी साथीदार ?

डॅनिअल : सावकार, टूमी यांना ओळखटा ?

विसाजी : हो हो, चांगला ओळखतों. माझ्या पोरीवर भाळून हातीं सांपडलेल्या वासुदेव बळवंताला फरारी व्हायला मदत करणारे हे अबदुल साहेब.

अबदुल : खामोश, साहेबांसमोर खोटंनाटं सांगून माझी बदनामी कराल तर त्याचा तुम्हांला जाब द्यावा लागेल ! साहेब, हा बदमाश त्या बंडखोराला आंतून सामील आहे.

विसाजी : काय, मी त्या वाश्याला सामील ? खोटं धादांत खोटं !

अबदुल : यांचा मुलगा विनायक, त्या बंडखोराच्या टोळींत सामील झाला आहे कीं नाहीं तें साहेबांनींच त्यांना विचारावं !

डॅनिअल : सावकार, हे काय म्हणटाट ?

विसाजी : साहेब, तो कार्टा घरांतून वर्षापूर्वींच नाहींसा झाला आहे. मग तो वाश्याच्या टोळींत सामील झाला कीं विनाशाच्या गर्तेत गाडला गेला, मला कांहींच माहीत नाहीं.

अबदुल : यांच्या वाड्यांत त्या बंडखोरांच्या नेहमीं गुप्त सभा भरतात. आणि हा बदमाश त्यांना पैसा व हत्यारंपात्यारं पुरवतो.

विसाजी : अहो साहेब, याच्यांतलं एक अक्षर देखील खरं नाहीं. माझ्या अब्रूवर हा दरोडा आहे. अहो, महाराणी साहेबांची नित्य पूजा केल्याशिवाय या विसाजीनं अन्नग्रहण केलेलं नाहीं. असा मी पक्का राजनिष्ठ असतांना हे माझ्यावर बंडखोरांना सामील असल्याचा धडधडीत खोटा आरोप करताहेत ! खऱ्याची दुनिया नाहीं हेंच खरं !

अबदुल : तुमच्या मुलीच्या हातांत पिस्तुल होतं; खरं ना ?

डॅनिअल : यांच्या मुलीच्या हाटांट पिस्टूल ? वंडर !

अबदुल : बोला सावकार, तुमच्या मुलीच्या हातांत त्या दिवशीं जें पिस्तुल होतं तें तुम्हीं कुठून मिळवलंत ? पिस्तुलाचा परवाना आहे तुमच्यापाशीं ?

विसाजी : (हंसून) हॅ हॅ हॅ ! तें दिवाळींतलं केप उडवायचं पिस्तुल ! इंग्रजांच्या राज्यांत तें पिस्तुलसुद्धां वापरायची बंदी ? हा निव्वळ जुलूम आहे. साहेब, मुलांच्या खेळांतल्या पिस्तुलाला देखील परवाना लागतो का ?

डॅनिअल : नो नो. दॅटीज सिंप्ली टॉयगन. ट्याला कशाला परवाणा हवा !

विसाजी : अबदुलसाहेब, त्या पिस्तुलाला का भिऊन तुम्ही वाश्याला जाऊं दिलांत ! धन्य आहे बुवा तुमच्या बहादुरीची ! साहेब, पोरीच्या हातांतलं पिस्तुल पाहून म्हणा, अगर तिच्या सौंदर्यानं मोहीत होऊन म्हणा, पण अबदुल साहेबांनीं त्या दिवशींची सुवर्णसंधि गमावली यांत तिळमात्र शंका नाहीं.

डॅनिअल : हकसाहेब, हे म्हणटाट टसं जर घडलं असेल—

अबदुल : आरोपीच फिर्यादी बनल्यावर—

विसाजी : किंवा फिर्यादीच आरोपी असल्यावर—

अबदुल : केवळ अल्लाच्या कृपेचा आधार घेण्यावांचून दुसरा उपाय नाहीं.

डॅनिअल : तर टी तुमच्या हुद्याला शरम आणणारी गोष्ट हाय. टूमी कामांट कुचराई केलीट, हाटीं सांपडलेल्या वासुडेव बळवंटला टूमी सोडून दिलाट असं आमी खाट्रीपूर्वक म्हणटो—

विसाजी : वा वा:! याला म्हणतात साहेबांची न्यायप्रियता!

डॅनिअल : असं आमी खाट्रीपूर्वक म्हणटो, असं टूमी बिलकूल समजूं नका! टूमची बेइज्जट टीच आमची ॲन्ड निजामसाहेबांची हाय. टेव्हां टूमी आठ डिवसाचे आंट, एक ट्या बंडखोराला पकडून टरी आणा किंवा हा बडमाष त्या वासुडेव बळवंटाला सामील आहे, हें मुद्यापुराव्याणिशी आमाला पटवून द्या. यापैकीं कोणटीच गोष्ट टूमच्याकडून घडली नाय, टर टूमच्यावर नालायकीचा शेरा मारून टूमाला परट आमी हैद्राबाडेस पाठवून देऊं! ढ्याणांट आलं? जा.

(अबदुल विसाजीवर डोळे फाडून पहात जातो. विसाजी हंसतो.)

विसाजी : छान खोड मोडली गुलामाची! साहेब, चोरीस गेलेल्या आमच्या मालमत्तेची काय व्यवस्था करतां?

डॅनिअल : टी तुमची मालमट्टा? टी गरीब रयटेची आहे. ट्यांचं हकाचं धण हाय. बडमाष, गरीब शेटकऱ्यांना नाडूण गब्बर बणलेले टुम्ही सावकार! त्या संपट्टीवर टूमचा काडीमात्र अधिकार नाहीं. टी त्या बंडखोरांकडून मिळवयाची आमी कोशीस करूं, ॲण्ड टी मिळटाच आमी टी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठींच खर्च करूं!

विसाजी : (स्व.) अरेच्या! तो वासुदेव बळवंतसुद्धां अगदीं अशीच भाषा बोलत होता. मग तो भला माणुस कीं हे साहेब भले आदमी! का हे दोघेही डाकूच!!

डॅनिअल : ट्या मालमट्टेटली एक सिंगल पायभी टूमाला मिळणार नाय. आणि आमच्या बड्या अंमलदारावर आटा टूमी जो घाणेरडा आरोप

केलाट टो जर खोटा ठरला, टर टूमाला जन्मठेप किंवा फांशीची शिक्षा द्यायला आमी मागंपुढं पहाणार णाय! टूमी आटा जा.

विसाजी : हा न्यायाचा धारवाडी काटा केव्हां कोणत्या बाजूला झुकेल त्याचा नेम नाहीं. एकंदरींत यांचं राज्य फार काळ टिकेलसं वाटत नाहीं. (जातो.)

(पडद्यांत—धांवा. पळा, जीव वांचवा! विश्रामबागवाड्याला आग लागली. सगळ्या सरकारी दप्तराची राखरांगोळी झाली. " धांवा धांवा ! ")

डॅनिअल : चपरासी, चपरासी! (रामा येतो.) काय गडबड आहे?

रामा : साहेब, विश्रामबागवाड्याला आग लागली.

डॅनिअल : विश्रामबागवाड्याला आग? त्या बंडखोराचंच हें कृत्य असावं. महत्त्वाचे सरकारी कागडपट्र, मुख्य प्रांटाचं रेकार्ड आणि खजिणा त्या वाड्यांत आहेत. कांहींही करून टे वांचवले पाहिजेट. चपरासी—

रामा : जी साब.

डॅनिअल : मोटद्दाराला माझा घोडा जीणसाज घालूण टयार करायला सांग. (रामा जातो.) बंडखोराचा हा बराच धाडसी प्रयट्न हाय. गव्हर्णमेंटला पॅरलाइज करण्याचा या आगीच्या माग मुख्य हेटू आहे यांट शंका नाय. आटां सर्व सामर्थ्य एक करूण, ट्या वासुडेव बळवंटला पकडल्याशिवाय सरकार अँड जनता यांना सुखशांटी लाभणार णाय! (जातो.)

प्रवेश दुसरा

[**स्थळ :** पुणें, नदीकांठचा रस्ता, रामा प्रवेश करतो.]

रामा : शहामत आहे या बंडखोरांची. विश्रामबागवाड्याची आग शांत होते न होते, तोंच बुधवारवाड्याला आग लागल्याची बोंब उठली. लगेच फडक्याचा वाडा पेटला! सारं पुणं शहर पेटतं कीं काय अशी सर्वांना धास्ती वाटूं लागली! मागें निजामानं पुणं जाळलं तशीच गत होते कीं काय म्हणून जो तो फिकीरींत पडला! आज चार दिवस झाले तरी अजून आग धुमसतेय! गेले चार दिवस साहेबाबरोबर धांवपळ करतां करतां

जीव बेजार होऊन गेला! म्हणून आज रजा काढून या एका बाजूला विश्रांति घेण्यासाठीं आलों आहें; बाकी सावकाराकडच्या नोकरीपेक्षां ही साहेबाकडची नोकरी फार चांगली. वेळच्या वेळीं पगार आणि रविवारीं रजा. सध्यां चैन आहे या रामाची. सावकाराकडचा वनवास चुकला. बेश झालं! (आंत पाहून) आं! तें कोण चाललं आहे? कोणी बाई दिसते, आं, अरे ही तर त्या साळुंके सुताराची सीता. बिचारी पोरवयांतच रंडकी झाली आन् उघड्यावर पडली बिचारी! सीता, अग सीता, हा रामचंद्र पट्टेवाला तुला जरा इकडे बोलावतो आहे. विश्रांतीच्या वेळीं स्त्रीचा सहवास, पुरुषांना श्रमपरिहार करायला फार उपयोगी पडतो.

(हातांत शेण्या गोळा करण्याची पाटी घेऊन सीता येते.)

सीता :

लइ द्वाड, द्वाड, द्वाड बाइ, पुरुषांची जात लइ द्वाड ॥ धृ० ॥
चटोर चौघे गोळा होती। नार एकलि अचुक हेरती।
नाजुकसा मग धक्का देती। काय आमुचा पाड ॥
पुरुषांचि जात लइ द्वाड ॥ १ ॥
चोळामधुनी झरझर जातां। पाठलाग करी मानव कुत्ता।
रागानें त्या शिवी घालतां। पडे तयाची धाड ॥
पुरुषांचि जात लइ द्वाड ॥ २ ॥

सीता : काय बाई पुरुषांचा त्रास तरी!

रामा : पुरुषांचा तुला त्रास वाटतो? पण पुरुषांना स्त्रीचा सहवास सुखकर वाटतो. मात्र ती कुरूप व थेरडी असतां कामा नये. बरं पाटी घेऊन कुठं चालली आहेस?

सीता : मसणांत चाललें आहें!

रामा : नाहीं, या मढे घाटाकडे तूं जाते आहेस, तेव्हां तूं मसणांत जाते आहेस हें तर उघडच आहे. पण कशाला जाते आहेस? हाडं गोळा करायला?

सीता : नाहीं हो. शेण्या गोळा करायला. पुरुषांना जाळायला!

रामा : पण पुरुषांवर तुझा इतका राग कां? कोणीं काय केलं तुला?

सीता : कुणाकुणाचं म्हणून नांव सांगूं. एकटी दुकटी रंडकी स्त्री कुठं कामाला जातांना दिसली, म्हणजे गांवांतले गुन्ड लोक चेकाळतात आन् तिची चेष्टा करायला लागतात. रंडकी स्त्री म्हणजे बेवारशी माल समजतात मेले!

रामा : मला त्यांचीं नांवं सांग. साहेबांना सांगून त्यांचा बन्दोबस्त करतों.

सीता : आतां त्या दिवशींची गोष्ट! विश्रामबागवाड्याला आग लागली म्हणून आम्ही दोघीचौघीजणी ती आग पहायला गेलों.

रामा : नाहीं ती खरोखर पहाण्यासारखीच होती. पण काय ग, तुला विश्रामबागवाड्याची आग आवडली का बुधवारवाड्याची? आपल्याला तर दोन्ही आवडल्या बुवा! बस्स, जन्माला यावं आन् अशा आगी पहाव्या!

सीता : कोण ती स्त्रीपुरुषांची अफाट गर्दी! त्या गर्दींत मेल्या गांवगुंडांनीं मला चारपांच वेळां तरी धक्के दिले!

रामा : तरी आपली, तूं टाचा वर करकरून आग पहातच होतीस. होय ना?

सीता : त्या दिवशीं मंडईत कणसं आणायला गेले होते. तर तिथंही एका धटिंगणानं मला धक्का दिला! निलाजरे मेले! पायांतली वहाण दावली तरी आपले दांत काढून फिदीफिदी हंसायला तयार!

रामा : पण मी म्हणतों अगोदर बायकांनीं गर्दींत जाऊं नये; आणि जाण्यावांचून त्यांचा जीवच राहात नसेल, तर पुरुषांचे धक्के खाण्याची त्यांनीं संवय केली पाहिजे. बाई दिसली कीं धक्का हा बसलाच! एवढी मोटी व्हिक्टोरिया राणी, पण तिलासुद्धां वासुदेव बळवंतानं कसा जबरदस्त धक्का दिला आहे तुला माहीत नाहीं.

सीता : मग आम्ही काय मुसलमानाप्रमाणं गोषांत सदासर्वकाळ रहावं होय!

रामा : छे छे. ती तर अगदींच वाईट चाल आहे. माणसानं मागं न जातां पुढं गेलं पाहिजे. आणि पुढं जाण्यांत, बायकांनीं आघाडी मारली पाहिजे. आतां साहेबाचं राज्य आहे. त्यांच्या मडमा अशा धक्क्याबिक्क्यांनीं नाराज होत नाहींत. उलट त्या खूष होतात.

सीता : इश्य! काय त्या मडमांचा पांढरापिकुट रंग! काय ते त्यांचे आखूड झगे; काय ती त्यांची विंग्रजी भाषा. मला तर मडमेकडे पाहातांच ओकारी येते!

रामा : आणि मला तरी कुठं मडम आवडतेय. वरचा टाकमटिकला पाहून घ्या. आंत सगळी घाण ! तुला पाहिली म्हणजे मात्र या रामाला किती आनंद, किती सुख वाटतं म्हणून सांगूं सीते !

सीता : पण तुम्हांला पाहून मला इतकी शिसारी येते कीं कांहीं विचारूं नका.

रामा : काय, काय ? या रामाला पाहून या सीतेला शिसारी वाटते ?

सीता : हो; तुमचा चेहरा पहातांच मला मळमळायला लागतं !

रामा : तूं रंडकी आहेस म्हणून तसं होत असेल. आणि म्हणूनच म्हणतों, तुला जर गुंडांचा धक्का चुकवायचा असेल, तर तूं माझ्याबरोबर म्होतूर लाव. म्हणजे मी तर तुला आवडेनच, पण तुझी ती मळमळही तुला आवडूं लागेल ! कां पटलं कीं नाहीं माझं म्हणणं ? पटलंच पाहिजे.

सीता : तुम्ही साहेबाचे चपराशी नसतात तर मी एक वेळ तुमच्याबरोबर म्होतूर लावायला तयार झालें असतें.

रामा : (रागानं) काय चपराशाला तूं हलका समजतेस ? पोलिस सुपरिंटेंडेंट सर मेजर हेन्री विल्यम डॅनिअल साहेबांच्या या चपराशाला तूं हलका समजतेस ? बायकांची अक्कल चुलीपुरतीच !

राम :

> चपरासि मी छान बनलों । चपरासि मी छान ।
> वाढे माझा मान ग । चपरासि मी छान ।। धृ० ।।
> बडेबडे ते शेट सावकार । लहान मोठे अंमलदार ।
> अजीजि करिती, द्रव्यही देती । राखिती माझा मान ग ।
> चपरासि मी छान ।। १ ।।

सीता :

> चपरासि तूं छान, केवळ समर्थघरचें श्वान, मेल्या समर्थ-
> घरचें श्वान । चपरासि तूं छान ।। धृ० ।।
> साहेबाच्या नित लाथा खाशी । शिव्यांची तर न्याहरी
> तुजशीं । ' जी हां ' करुनि पोट जाळिशी । देइ न तुज
> कुणी पान रे । मानाचें कधि पान ।
> चपरासि तूं छान ।। २ ।।

सीता : त्यापेक्षां तुम्ही पलटणींतले जवानगडी असतात—

रामा : म्हणजे मी एखाद्या लढाईत मेलों असतों, आणि मग तुला दुसऱ्यांदां रंडकेपणा आला असता ना?

सीता : पण मी वीरपत्नी म्हणून दिमाखानं वावरलें असतें!

रामा : काय बायकांची जात पहा! नवऱ्याच्या मृत्यूच्या सांगाड्यावर या दिमाखाचा डोलारा उभारूं पाहातात. हें बघ सीते, मर्दाची बाईल बनून रंडकेपणाची वारी करण्यापेक्षां, या पट्टेवाल्याची पट्टेवाली म्हणून शहरभर मिरवावं हें अधिक चांगलं. आण ती पाटी इकडे. (तिच्या हातांतून पाटी हिसकून घेतो.)

सीता : मुकाट्यानं माझी पाटी द्या हं!

रामा : गुपचूप माझी बायको व्हा हं!

सीता : उठल्या बसल्या 'जी साब जी साब' करणारा असला मेषपात्र नवरा कोणती बाईल पत्करील?

रामा : मी मेषपात्र काय? मग तूं फुलपात्र आहेस!

सीता : तुमच्यापेक्षां, त्या वासुदेव बळवंताच्या टोळींतला एखादा तगडा तिरंदाज भिल्ल रामोशी मला अधिक आवडेल!

रामा : माझ्या पराक्रमाबद्दल तुझी तक्रार आहे ना? मग आत्तां दाखवतों माझा पराक्रम! आण, तरवार आण, भाला आण, तिरकमठा आण, बंदुक आण. अरे पण हो! हें इंग्रजांचं राज्य आहे. शस्त्र वापरण्याची या राज्यांत बंदी आहे. हें मी अगदींच विसरलों. ठीक आहे. एका लाथेसरशीं या तुझ्या वाटोळ्या पाटीची मी चौपाटी करून टाकतों! (पाटी खालीं टाकतो.)

सीता : पुरे पुरे तुमचा पराक्रम! माझ्या पाटीची दामटी होईल आणि घरीं गेल्यावर बाबा माझ्या पाठीची चामडी लोळवतील! (पाटी झटकन् उचलून घेते व निघून जाते.)

रामा : छट्! बायकांच्या सहवासानं सुख होण्याच्या ऐवजीं उलट डोक्याला त्रास मात्र होतो. ती मला मेषपात्र म्हणाली! असली शिवी एखाद्या स्त्रीनं दिली असतां, पुरुषाला मेल्याहून मेलं होऊन जातं! माझ्यापेक्षां तिला भिल्ल रामोशी बरा वाटला काय? या सीतेला आज जरी ते रावण कुंभकर्ण गोड वाटत असले, तरी शेवटीं ती या रामालाच वरणार हें निर्विवाद! (जातो.)

प्रवेश तिसरा

[स्थळ – बहिरोबाच्या डोंगरावरील वासुदेव बळवंताची वास्तव्याची ' व्याघ्रमुख ' नांवाची घळ. चोहोंबाजूस गर्द झाडी असून, मधून मधून पाषाणाचे सुळके वर डोकं काढून जणुं काय द्वारपालाचं काम करीत आहेत. मध्यभागीं एका लंबोत्तर भव्य पाषाणाला शेंदूर फासला असून त्याचे शेजारीं शुभ्र निशाण फडकत आहे. दौल्या, खौल्या, चवल्या, पावल्या, इ. भिल्ल रामोशी डफ, ढोल, झांजा वाजवीत गाणें म्हणत नाचत आहेत.]

भजनपुजन करूं खंडुबाचं खंडुबाचं ।
मंगल दैवत तें अमुचं ॥ मल्हारी मार्तंड
आम्हांवरी । कृपाछत्र तूं सदा धरी ॥
महाराजांना बरकत दे । गोरा साहेब उलथूं दे ॥ १ ॥

दौल्या : काय रे गड्यांनो, आपले महाराज पुण्याला गेले हैती, ते अजून परत कसे न्हाई आले ?

खौल्या : वाइुळ वखत झाला. म्हणून शान त्यांची आम्हास्नी लई काळजी वाटते हाय.

दौल्या : त्या दिसच्या त्या हैद्राबादी रानडुकराची मला राहून राहून लई धास्ती वाटतेया ! कवा मुसंडी मारील त्येचा नेम नाहीं.

खौल्या : अं : ! त्याची धास्ती बाळगण्याचं कारण नाहीं. आपले महाराज त्याला सरळ वाटेला लावतील ! कोनच्या वाटेला माहीत हाय ?

दौल्या : कोणत्या वाटेला ?

खौल्या : अरं वरच्या वाटेला ! (सर्व हंसतात.)

दौल्या : सरळ अल्लाच्या भेटीला त्याला पाठवतील म्हणतोस ?

खौल्या : महाराजांच्या प्राणांची मला एकसारखी धाकधूक वाटते, त्याचं कारण असं आहे कीं, टोपीवाल्यानं त्यांना धरण्यासाठीं हजारों रुपयांचीं इनामं लावलीं हैती, तुम्हासी ठावं हैना ?

दौल्या : व्हय व्हय.

खौल्या : तवा तीं इनामं मिळवून इनामदार बनूं पहाणारा एखादा बेमान मादरचोद, साहेबाला त्यांची खबर द्यायला कमी करायचा नाहीं.

दौल्या : खरं र खरं! उमाजी नायकाच्या बहिणीनं जसा नाईकसाहेबांचा घात केला, त्याप्रमाणं बेरडाची अवलाद एखादा बाळाजीपंत नातू महाराजांच्या गळ्याला तात लावायचा!

खौल्या : म्हूनशान म्हणतो दौल्या, महाराजांना यायला जवा इतका वखुत झाला हाय, तवा त्यांच्या जीवाला कांहींतरी धोका असावा असं वाटतंया.

दौल्या : अर, आपल्या खंडुबालाच आपुन विचारूं या. मंजी बराबर समजेल संमदं!

खौल्या : हां जी हां! खंडुबालाच इचारूं या. दौल्या, लाव खंडुबाला कळा.

दौल्या : (खंडोबाला कळा लावून हात जोडतो) देवा 'खंडुबाराया, आमच्या महाराजांच्या जिवाला कांहीं बी धोका असेल तर डावी देशील, आन् ते खुशाल असत्याल तर उजवी देशील! (उजवीकडचं फूल खालीं पडतं. दौल्या टाळी वाजवतो व सर्वजण आनंदानं नाचूं लागतात.) गड्यांनो, महाराज खुशाल हैती. खंडुबानं उजवी दिली बघा.

(पडद्यांत पुढील दवंडी होते :—"ऐका हो ऐका! लोकहो ऐका! प्रख्यात बंडखोर वासुदेव बळवंत, यानें सर्व रयतेला राणीच्या राज्याविरुद्ध चिथावून, सशस्त्र बंड करण्याचा उद्योग चालवला आहे. त्यामुळें देशांतील शांततेला आणि सुव्यवस्थेला धोका उत्पन्न झाला आहे. तरी जो कोणी त्या बंडखोराला जिवंत अगर मेलेला पकडून देईल, त्याला सरकारांतून दोन हजार रुपये आणि चांदीचा तोडा इनाम देण्यांत येईल हो.")

खौल्या : अरं दौल्या, त्ये बग. महाराज हकडं येतांना दिसत्यात. आन् त्यांच्या बरोबर कोणी आवा भी दिसतिया.

दौल्या : अरं ती तर त्या सावकाराची ल्येक दिसतीया. कशी सुक्राच्या चांदणीवाणी चमकतिया! (वासुदेव बळवंत व सावित्री येतात.)

सर्वजण : जय यळकोट मल्हार! जय मल्हारी मार्तंड!!

वासुदेव : जय मल्हारी मार्तंड, जय शिवाजी महाराज! गड्यांनो, तुम्ही सर्व खुशाल आहांत ना?

दौल्या : आमास्नी काय धाड आलीया! लइ मौज वाटतिया! खूस हैती संमदं.

वासुदेव : गड्यांनो, भाकरतुकडा खाल्लात?

दौल्या : नाहीं बा! आपुन आल्याबिगर आमी भाकर कशी खावी जी!

खौल्या : देवास्नी नैवेद्य दाखवल्याबिगर कोणता कोंबडीचा भगत परसाद खानार हाय?

वासुदेव : दोस्तांनो, तुमची माझ्यावरची निस्सीम भक्ति पाहून, हृदय कृतज्ञतेनं भरून येतं!

सावित्री : महाराज, अडाणी अंतःकरणांतली, ही भावभक्तीची सोज्वळ गंगा पाहून, मोठा संतोष वाटतो!

वासुदेव : शहरांतील पढतमूर्खांच्या हृदयांत, या गंगेचा टिपूसही सांपडायचा नाहीं. काय सांगूं सावित्री, स्वतः थाळी पिटून, शनवारवाड्यापुढें उभं राहून, पुण्यातल्या सुशिक्षितांना, देशाच्या पारतंत्र्याची जाणीव करून देण्याचा मीं अट्टाहास केला—

सावित्री : मग त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं?

वासुदेव : तो उपदेश केवळ पालथ्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणें निष्फळ झाला! उलट 'हा कोणीतरी वेडापीर आहे, त्याला उचलून कारागारांत कां टाकीत नाहींत' असे हृदयाला घरे पाडणारे उद्गार, कांहीं राजनिष्ठांच्या मुखांतून बाहेर पडत!

सावित्री : सरकारी नोकरीच्या सुखाला लालचावलेल्या, सुखासीन लोकांना स्वातंत्र्याची महती काय कळणार?

वासुदेव : म्हणून त्या दरबारी लब्धप्रतिष्ठितांचा नाद सोडून, मीं या भिल्लरामोशांची सोबत केली आहे. गड्यांनो, काढा तुमच्या भाकऱ्या. आपण सर्वजण मिळून मजेत भोजन करूं!

दौल्या : महाराज, आपल्यासाठीं बाजरीची भाकरी आणि लसणाचं तिखट आणलं आहे म्या. (जवळची भाकरी व कोरड्यास देतो.)

वासुदेव : आण, आण इकडे.

सावित्री : राहूं दे तें. महाराज, त्यांना खाऊं दे त्यांची भाकर सुखानं ! आपल्यासाठीं मीं हे दिवाळीचे पदार्थ आणले आहेत. त्यांचा आपण स्वीकार करावा.

वासुदेव : सावित्री, माफ कर. मीं स्वदेशीची शपथ घेतली आहे. तेव्हां विलायती साखरेंतले तुझे पदार्थ मला खातां येणार नाहींत.

दौल्या : शिवाय या कष्टाच्या मीठभाकरीची सर त्या सावकाराकडच्या पदार्थांना थोडीच्च येणार हाय ?

वासुदेव : खरं म्हणतोस. सावित्री, तुझे ते पदार्थ या आमच्या भाकरीपुढं कःपदार्थ आहेत. रानांतल्या पशुपक्षांना ते खुशाल खाऊं घाल ! (कांदा-भाकरी खाऊं लागतात.) माझ्यासाठीं दोस्तांनो, तुम्हांला कष्ट पडतात. जीव मुठींत धरून रात्रंदिवस सरकारी शिपायांपासून स्वतांचा अन् माझा बचाव करण्यासाठीं तुम्हांला जो त्रास सहन करावा लागतो...

दौल्या : नाहीं नाहीं महाराज, आम्हांला मुळींच त्रास वाटत नाहीं. उलट आपण जो टोपीवाल्यांचा कांटा काढण्याचा उद्योग आरंभला हाय त्याबद्दल आम्हां भिल्लरामोशांना लई लई आनंद वाटतो. सूख वाटतंया.

वासुदेव : बरं कांहीं नवी खबरबात !

दौल्या : तुमास्नी धरन्यापायीं टोपीवाल्यानं दोन हजारांचं इनाम लावलं हाय.

वासुदेव : मला धरण्यासाठीं किती बक्षीस लावलं आहे म्हणालास ?

दौल्या : दोन हजाराचं.

वासुदेव : बस्स, दोन हजारांचंच ? इंग्रजांचं राज्य म्हणजे बनियांचं राज्य आहे म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. सरकारचं राज्ययंत्र खिळखिळं करून, ब्रिटिश साम्राज्याला हादरा बसवणाऱ्या, या दुसऱ्या शिवाजीला पकडण्यासाठीं फक्त दोन हजारांचंच बक्षीस ! सावित्री, कोणीही या पठ्याला सरकारच्या स्वाधीन करण्याचं शतकृत्य करावं व टोपीवाल्याकडून दोन हजार रुपये घ्यावे ! श्रीमंत आणि सुखी होण्याची नामी संधि !

सावित्री : पण असला अधमाधम कोणी निपजलसं वाटत नाहीं.

वासुदेव : भिल्ल रामोशांत कोणी आढळणार नाहीं हें खरं ! पण आमच्या या दुर्दैवी देशांत, असे कांहीं नरपशू आहेत कीं, ते क्षुद्रस्वार्थासाठीं, आपल्या जननीशींदेखील मात्रागमन करायला चुकत नाहींत. तिथं मला पकडून देण्याची काय कथा ?

दौल्या : तसा मांग अवलादीचा बेरड मला गवसला, तर त्याला जरासंधावानी उभा चिरल्याशिवाय ह्यो दौल्या राहणार नाहीं.

वासुदेव : काय म्हणालास दौल्या, मला पकडण्यासाठीं सरकारनं दोन हजाराचं बक्षीस लावलं आहे का ?

दौल्या : व्हय महाराज, तसं कागद चावडीवर चिकटवलं हायती !

खौल्या : आन् समदीकडे दवंडी बी फिरली हाय.

वासुदेव : तर मग सरकारच्या या जाहीर इनामाला, आपल्यालाही तोडीस तोड ठेवून द्यायला हवी. हें पहा दौल्या, मी पण इनाम जाहीर करतों.

दौल्या : पण महाराज, इनाम कशासाठीं आन् किती रुपयांचं ?

वासुदेव : पांच हजार रुपयांचं ! आणि तें कशासाठीं माहीत आहे ?

दौल्या : कशासाठीं ?

सावित्री : महाराज, पांच हजारांचं बक्षीस कोणत्या कामगिरीसाठीं ?

वासुदेव : कोणत्या कामगिरीसाठीं ? मुंबईच्या गव्हर्नरच्या मुंडक्यासाठीं !

दौल्या : लई ब्येस. लई ब्येस.

वासुदेव : सर रिचर्ड टेम्पलचं शिर मला आणून द्यावं आन् रोख पांच हजार रुपयांचं इनाम आन् शिरपाव घेऊन जावा.

दौल्या : ह्ये इनाम आपुन मिळवनार !

खौल्या : नाहीं नाहीं. ह्ये इनाम मी मिळवनार !

सावित्री : महाराज, हें इनाम मिळवण्यासाठीं कोण ही स्पर्धा ?

वासुदेव : सावित्री, हें मीं जाहीर केलेलं इनाम मात्र एखादा बेडर वृत्तीचा भिल्लरामोशीच मिळवील ! सुशिक्षित पांढरपेशांची ती हिम्मत नाहीं. बरं, दौल्या-खौल्या, चोहोंबाजूला दक्षतेनं टेहळणी करा. कारण पुण्यास आगीचा डोंब पेटल्यामुळ डॅनिअलसाहेब खवळून गेला आहे. माझ्यावर

त्याची धाड केव्हां पडेल त्याचा नेम नाहीं. मला यापुढं विशेष सावध-गिरीनं वागलं पाहिजे. नीट हुशारीनं पहारा करा; जा. (' जय यळकोट मल्हार ' म्हणून सर्वजण जातात.) सावित्री, बैस. (दोघेजण निरनिराळ्या शिळेवर बसतात.)

सावित्री : पण महाराज, पुण्याच्या आगीच्या मुळाशीं आपणच असल्याचा पुष्कळांचा समज आहे.

वासुदेव : तो अगदीं चुकीचा आहे. त्या आगीशीं माझा मुळींच संबंध नाहीं. पण झाली गोष्ट अनुचित घडली असं मात्र मला वाटत नाहीं.

सावित्री : पण महाराज, अशानं आपलं मुख्य ध्येय दुरावणार नाहीं का?

वासुदेव : मला तसं मुळीच बिलकुल वाटत नाहीं. त्यामुळं टोपीवाल्याला आमची दहशत बसेल, आणि जनतेवरील जुलमाची तीव्रता जरा तरी कमी होईल. परिणामावरून कार्याचं महत्त्व अजमावायचं असतं !

सावित्री : तें खरं. पण त्यामुळं कित्येक निरपराधी लोकांना सरकारी छळ सोसावा लागेल, त्याची काय वाट ?

वासुदेव : विश्रामबागवाडा व बुधवारवाडा यांना लागलेल्या आगीमुळं, पुण्यांतील बऱ्याच प्रतिष्ठितांना नाहक बळी जावं लागेल हें मला स्पष्ट दिसतं आहे. आणि त्याचं प्रत्यंतर म्हणजे, माझे राजकीय गुरु न्यायमूर्ति रानडे यांच्यासारख्या थोर देशभक्ताला केवळ संशयावरून, पुण्यांतून उचलून धुळ्यास रवाना करण्यांत आलं, हें होय !

सावित्री : एवढ्या मोठ्या सरकारी अधिकाऱ्याची ही स्थिति; मग इतरांची दुर्दशा तर विचारायलाच नको !

वासुदेव : हें बघ सावित्री, एकदां वनाला वणवा लागल्यावर हिंस्र श्वापदांबरोबर, कांहीं सोज्वळ ससेही होरपळून निघणारच ! त्याबद्दल खेद करण्यांत अर्थ नाहीं. बरं पण तूं कां आली होतीस ?

सावित्री : आपल्या दर्शनासाठीं महाराज.

वासुदेव : पण हें दर्शन तुला भलतेंच महाग पडेल ! एखादे वेळीं प्राणाला मुकावं लागेल तुला !

सावित्री : मग त्यांत वाईट काय आहे ? आपल्यासारख्या महात्म्याच्या संगतींत मरण आलं तर मी स्वताला धन्य समजेन ! पण महाराज, माझा विनायकदादा कुठं आहे ?

वासुदेव : त्याला मीं हैद्राबादेस हत्यारं खरेदी करण्यासाठीं पाठवला आहे. आजउद्यां इतक्यांत तो आला पाहिजे. सावित्री, आमच्यापाशीं मनुष्यबळ भरपूर आहे. पण सरकारच्या हत्यारबंदी कायद्यामुळं, आम्हांला शस्त्रास्त्रं व दारूगोळा चोरून मारून मिळवावा लागतो, आणि ती सामग्री जबर किंमत देऊन आम्हांला खरेदी करावी लागते. तुमच्या वाड्यांतून लुटून आणलेली सर्व धनदौलत या कामगिरीसाठीं मीं खर्च केली !

सावित्री : त्या संपत्तीचा सत्कारणींच व्यय झाला असंच म्हटलं पाहिजे. महाराज, दादानं मला त्या दिवशीं ओवाळणींत घातलेलं तें भरलेलं पिस्तुल, कसं उडवायचं याचा सराव करण्यांत मीं तें रिकामं करून टाकलं ! तेव्हां मला आणखी काडतुसांची गरज आहे.

वासुदेव : आतां विनायक आला म्हणजे तुला लागतील तितकीं काडतुसं घेऊन जा. मात्र सावित्री, तुम्ही बायका विसराळू असतां. धांद्रटपणानं एखादे वेळीं चुलीजवळ किंवा वेणीफणीच्या पेटींत पिस्तुलं ठेवशील, आणि शेजारच्या साळूताईच्या नजरेस पडेल, आणि सगळाच घात होईल बरं ! पिस्तुलाचे बाबतींत गाफील राहूं नकोस ! हा आगीशीं खेळ आहे हें विसरूं नकोस !

सावित्री : आगीशीं खेळायची आम्हां बायकांना संवयच असते मुळीं. चूल आणि वैल हे तर आमचे नित्याचे खेळगडी. स्वयंपाकघर हें आमचं राज्य, विळी–कोयती व पाटा–वरवंटा आमचीं शस्त्रं—

वासुदेव : आणि चूल हें सिंहासन; होय ना ?

सावित्री : इश्य ! त्या सिंहासनावर कोण बसेल ?

वासुदेव : पण विनायक अजून कसा आला नाहीं ! (पडद्यांत—"पकडा पकडा. तो पहा वासुदेव बळवंत. त्या करवंदीच्या जाळींत लपला." असा गलका व मागून बंदुकीचा आवाज होतो.) सावित्री, मला इंग्रजांचं

धरणं आल्यासारखं दिसतं. (इतक्यांत रक्तबंबाळ स्थितींत धांपा टाकीत विनायक येतो.) कोण, विनायक. तुझी अशी अवस्था कशानं झाली ?

सावित्री : माझा विनायक दादा ! दादा दादा, कुणी रे हा अधमपणा केला ?

वासुदेव : विनायक, काय झालं रे ?

विनायक : मी हैद्राबादेहून शस्त्रास्त्रं व दारूगोळा घेऊन आलों, व तो आपल्या नेहमींच्या गुप्त जागीं सुरक्षित ठेवून, आपल्याला ही वर्दी देण्यासाठीं इकडे यायला निघालों. इतक्यांत लांब खिंडीच्या तोंडाशीं, घोड्यावर स्वार होऊन, दुर्बिणीनं सभोंवार टेहळणी करीत असलेला डॅनिअल मला दिसला. त्यानंही मला हेरलं व माझ्या रोखानं यानं दौड मारली.

सावित्री : आणि मग पुढं ?

विनायक : त्याला चुकवण्यासाठीं मी करवंदीच्या जाळींत दडलों. पण इतक्यांत माझ्या रोखानं कोणीतरी बंदूक झाडली ! डाव्या खांद्याला गोळी जरा चाटून गेली इतकंच !

सावित्री : बरं तर बरं ! नाहींतर केवढा घोर प्रसंग कोसळता माझ्या विनायक दादावर !

वासुदेव : रक्तस्राव बराच झाला आहे. जखम विशेष मोठी नसली तरी ती बंदुकीच्या गोळीची जखम आहे. वेळींच उपाय केला नाहीं तर तिच्या विषाचा फैलाव सर्वांगावर झाल्याशिवाय राहात नाहीं.

सावित्री : अगबाई, तर मग त्वरित उपचार केला पाहिजे. दादा, चल त्या निवाऱ्याच्या जागेला आपण जाऊं. तिथं तुझ्या जखमेला धुऊन, तिच्यावर औषधोपचार करण्याची मी तजवीज करतें.

वासुदेव : विनायक, जा. तिच्याबरोबर जाऊन जखमेवर उपचार करून घे जा.

विनायक : महाराज, माझ्या जखमेचं राहूं द्या. पण तुम्हांला धरण्यासाठीं डॅनिअल साहेब येतोय. आन् त्याच्याबरोबर तो अबदुल आणि विसाजीपंत आहेत.

सावित्री : कोण, आपले बाबा आहेत त्याच्याबरोबर ?

विनायक : होय, तुझा बाप तो विसाजी.

सावित्री : माझा बाप, अन् तुझा नाहीं वाटतं ?

विनायक : माझ्या बापाला मीं कधींच तिलांजलि दिली आहे. महाराज, त्वरा करा. कुठंतरी सुरक्षित ठिकाणीं थोडा वेळ लपा. (पडद्यांत–डॅनिअल–"शिपायांनो, सर्व वाटा रोखून धरा. या ठिकाणीं आज तो बंडखोर वासुदेव बळवंट खात्रीनं सांपडेल.")

वासुदेव : तुमच्या बापाला मी सांपडणार नाहीं. सावित्री, तूं विनायकला बाजूला नेऊन त्याच्या जखमेवर मलमपट्टी लावण्याची तजवीज कर. विनायक, जा.

विनायक : नाहीं महाराज. तुम्हांला संकटांत टाकून मी बाजूला जाणार नाहीं. माझी जखम कांहीं काळजी करण्यासारखी नाहीं.

वासुदेव : सावित्री, तूं तरी त्या पलीकडच्या गुहेत जाऊन निवाऱ्याला बैस.

सावित्री : महाराज, ही सावित्रीही या विनायकाची बहीण आहे. तुम्हांला वैऱ्याहातीं देऊन स्वताचा बचाव करण्याचा भ्याडपणा मला रुचणार नाहीं. महाराजांच्या प्राणांचा बचाव करणं हेंच आम्हां बहीण–भावाचं कर्तव्य आहे.

वासुदेव : बरं तर. आपण सर्वजण आतां त्या पलीकडच्या भव्य पाषाणाआड दडूं या; आणि योग्य समय येतांच शत्रूवर तुटून पडूं !

(वासुदेव, विनायक व सावित्री बाजूच्या दगडाआड दडतात. विसाजीला गचांडी मारीत अबदुल येतो.)

अबदुल : हरामखोरा, दाखव वासुदेव बळवंत कुठं आहे तो !

विसाजी : मी तुम्हांला त्याचा ठावठिकाणा अचुक सांगेन. पण तो हातीं लागतांच, दोन हजारांचं बक्षीस मलाच मिळालं पाहिजे हो !

अबदुल : बक्षिसाचं पुढं पाहातां येईल, अगोदर तो बंडखोर सांपडला पाहिजे.

विसाजी : साहेब, तुम्ही अगोदर इथं बसून थोडी विश्रांति घ्या. आत्तां इतक्यांत वाशा येईल ! (अबदुल एका शिळेवर बसतो.)

अबदुल : बहिरोबाच्या डोंगरावरची ही व्याघ्रमुखी गुहा त्या बंडखोराची लपायची जागा आहे, असं आम्हांला तपासाअंतीं कळलं म्हणून आम्ही इकडे आलों. त्या बदमाशाच्या शोधासाठीं धांवपळ करतां करतां आमचा जीव दमून गेला आहे. यावेळीं शरीराचा थकवा घालवण्यासाठीं आणि

दिल बेदरकार होण्यासाठीं थोडीशी शराब घेणं जरूर आहे. (गळ्यांतली पाण्याची पिशवी काढून तोंडाला लावतो.)

विसाजी : साहेब, घसा कोरडा पडला असला तर जरा पाणी प्या.

अबदुल : सावकार, तुम्हाला देऊं का हें पाणी ?

विसाजी : छट्. म्लेंच्छाच्या हातचं पाणी पिऊन मी बाटूं कीं काय ?

अबदुल : पण काय रे सावकारा, मघाशीं आपण गोळी झाडून जायबंदी केला तो वासुदेव बळवंत होता ना ?

विसाजी : छे. मला वाटतं तो एखादा कोल्हा नाहीं तर तरस असावा !

अबदुल : म्हणजे आमची गोळी फुकटच गेली म्हणायची ?

विसाजी : (स्व.) तुमच्यासारख्या प्रेमवेड्यांच्या गोळ्या नेहमींच फुकट जायच्या !

अबदुल : पण तो बदमाष वासुदेव बळवंत अजून कसा येत नाहीं ?

विसाजी : अहो तो काय तुमचा नोकर आहे ? कीं 'जी साब' म्हणून तात्काळ तुमच्या पुढं हात जोडून उभा राहील ! बाकी साहेब, त्या दिवशीं तुम्हीं ढिलाई दाखवली नसतीत, तर एव्हाना तो वाश्या फासावर लटकावला गेला असता.

अबदुल : तीच गोष्ट माझ्या मनाला सारखी बोचते आहे. आन् त्यामुळं डॅनिअल साहेबांचा ठपका मला सोसावा लागला आहे. तुझ्या त्या खुपसूरत छोकरीनं माझ्या तोंडाला हा कलंक फासला आहे. त्याचा बदला घेतल्याशिवाय मी कधींही राहणार नाहीं. या सापाला तिनं डिवचलं आहे; त्याचा सूड त्या उद्दाम छोकरीची इज्जत घेऊन—

(एकदम विनायक त्याच्यावर झडप घालून त्याला खालीं पाडतो. सावित्री त्याची बंदूक झटकन् हस्तगत करून घेते.)

विनायक : हरामखोरा ! कुणाची इज्जत घेणार तूं ? या माझ्या बहिणीची ? हिम्मत असली तर पुन्हा ते शब्द उच्चार पाहूं ! तुझ्या जिभेचेच काय, पण तुझ्या देहाचे तुकडे केल्याशिवाय, वासुदेव बळवंताचा पट्टशिष्य हा विनायक राहणार नाहीं.

विसाजी : विन्या विन्या, अरे हें काय चालवलं आहेस तूं ? ते वरिष्ठ अधिकारी आणि त्यांच्या उरावर काय बसलास ? मूर्ख नाहीं तर. बाजूला हो.

अबदुल : अहो सांगा, सावकार, तुमच्या मुलाला बाजूला व्हायला सांगा.

विसाजी : विनायकराव, बाजूला व्हा. बापाच्या शब्दाला मान देणार ना ?

विनायक : माझ्या बहिणीची, या हलकटानं माफी मागितल्याशिवाय, मी याला हातचा सोडणार नाहीं !

विसाजी : अं: ! ही अगदीं साधी गोष्ट आहे. अबदुलसाहेब, करा त्याच्या सांगण्याप्रमाणं. यांत तुमची इज्जत बिलकुल खराब होत नाहीं. कारण, तुमच्या इज्जतीची, त्या दिवशीं डॅनिअल साहेबांनींच, साफ हजामत केली आहे !

विनायक : तुला तुझे प्राण हवे असले तर मी सांगतों त्याप्रमाणें कर.

अबदुल : (स्वगत) प्रसंग पडे बाका, तो गधेको कहेना पडता है काका. (उघड) बेहन सावित्री, केवळ दारूच्या निशेंत गाफीलपणानं उच्चारलेले बेइज्जतीचे शब्द मी परत घेतों. आणि तुझी माफी मागतों. बेहन, कसूर माफ करना. मैं लाचार हूं !

विसाजी : भले शाबास ! आतां पुढचा विधीही उरकून टाका.

विनायक : हां, चल आटप आतां. माता म्हणून तिच्या पायां पड.

अबदुल : और सावित्रीमय्या, मैं तेरे कदमोंपर पडता हूं ! (पायां पडतो.)

विनायक : जा, आतां काळं तोंड घेऊन. (अबदुल उठून उभा राहतो. आपली बंदूक, पिस्तुल शोधूं लागतो.)

अबदुल : हमारी बंदुक और पिस्तुल कहां है ?

विनायक : तीं सरकारजमा झालीं.

सावित्री : तीं स्वतंत्र भारताच्या मालकीचीं झालीं ! (दौल्या घाईघाईनें प्रवेश करतो.)

दौल्या : महाराज महाराज. पण महाराज कुठं आहेत ?

विनायक : काय रे दौल्या, काय बातमी आहे ?

दौल्या : टोपीवाला डॅनिअल साहेब इकडंच येतोय जनूं !

अबदुल : डॅनिअल साहेब इकडेच येताहेत ? या स्थितींत त्यांच्यासमोर

उभं राहण्याची मला हिम्मत होत नाहीं. तेव्हां आपण इथून वेळींच निसटावं हें उत्तम.

विनायक : तो कुठवर आला आहे?

दौल्या : त्याला मीं जिवतीच्या ओढ्यापाशीं पाहिला. तिथं तो घोड्यावरून खालीं उतरला आणि मधल्या आड वाटेनं डोंगर चढून तो एव्हांना जवळपास येऊन टेपला असावा! मी त्याच्यावर टेहळणी ठेवतों. (जातो.)

विसाजी : अबदुलसाहेब, तुमचे वरिष्ठ अधिकारी डॅनिअल साहेब येताहेत.

विनायक : तेव्हां त्यांना सॅल्यूट ठोकायला पुढं व्हा.

सावित्री : आपल्या हाताखालच्या अंमलदाराची ही दशा पाहून, तुमचे साहेब बडे खूष होतील आणि तुम्हांला बढती देतील!

अबदुल : बढती बाजूला राहून बडतर्फी मात्र आमच्या पदरांत पडणार! त्यापेक्षां आपणच राजीनामा देऊन येथून हैद्राबादेस गेलेलं काय वाईट! पण जाण्यापूर्वीं माझी बेइज्जत करणाऱ्या या बहीणभावांचा कांटा काढल्या-शिवाय मी राहणार नाहीं. [जातो.]

विसाजी : अहो अहो, अबदुलसाहेब, चाललांत काय? माझं दोन हजारांचं बक्षीस द्या, आन् मग हैद्राबादेस जा नाहींतर जाफराबादेस जा. अरे, गेलाच कीं तो. जाऊं दे बेट्याला. आतां वासुदेव बळवंताचा ठाव-ठिकाणा डॅनिअल साहेबांना सांगून, आपण त्यांच्याकडून दोन हजारांचें इनाम उपटूं या. बस्स् ठरला बेत!

सावित्री : बस्स् ठरला बेत! बाबांना उचलून त्या कड्यावरून खालीं लोटायचं!

विसाजी : काय? माझा कडेलोट! आन् तो माझ्याच कन्येकडून?

सावित्री : तुम्हांला दोन हजार रुपये पाहिजेत ना? मग त्या कड्याखालीं खूप संपत्ती सांठवून ठेवलेली आहे दरोडेखोरांनीं! तुम्हांला हवी तितकी घेऊन जा.

विसाजी : वा रे वा ! बापावरील प्रेमाचा पोरीनं कडेलोट केला !

सावित्री : दादा, धर बाबांचा हात. आपण दोघेजण त्यांची पालखी करून अलगत त्या कड्याखालील संपत्तीच्या राशीवर त्यांना लोटून देऊं या !

विनायक : उकिरड्यावर गाढवं लोळतात, त्याप्रमाणं त्या धनदौलतीच्या ढिगाऱ्यावर यांना मनसोक्त लोळूं दे !

विसाजी : अहा रे ! काय पण रत्नं माझ्या पोटीं जन्माला आलीं आहेत !

विनायक : अरे, पावलांची चाहूल ऐकूं येऊं लागली. टोपीवाला अगदीं जवळ आल्यासारखा दिसतो. महाराजांना सावध केलं पाहिजे.

वासुदेव : (एकदम पुढं येऊन) हा वासुदेव बळवंत नेहमींच सावध असतो. टोपीवाल्याशीं सामना द्यायचा मग बेसावध राहून कसं चालेल ? काय सावकार, टोपीवाल्या साहेबाकडून दोन हजारांचं इनाम मिळालं कीं नाहीं ?

विसाजी : छे हो ! कुठलं मिळतंय् ! तो एक दाढीवाला साहेब तर अब्रू व हत्यारं गमावून नुकताच पळून गेला !

वासुदेव : दाढीवाला जसा पळाला तसाच आतां येणारा हा टोपीवालाही जीव घेऊन पळाला नाहीं तर नांव बदलून देईन ! सावकार, तुम्हांला बक्षीस मिळवायचंय् ना ?

विसाजी : बक्षीस नको मिळवूं तर काय करूं ? पोटांत काय कांटे भरूं ? कर्तासवर्ता मुलगा तुझ्या टोळींत सामील झाला. माझं वडलार्जित धन तूं त्या दिवशीं लुटून नेऊन मला असा रंक करून सोडलंस. मग सरकारनं जाहीर केलेलं बक्षीस मिळवण्याची धडपड करण्यावांचून आम्हांला दुसरा कोणता उदरनिर्वाहाचा मार्ग आहे बरं !

वासुदेव : तर मग सावकार, मीं लावलेलं बक्षीस मिळवा. म्हणजे तुमची जन्माची काळजी दूर होईल !

विसाजी : काय, तूं बक्षीस लावलं आहेस ?

वासुदेव : होय. पांच हजारांचं.

विसाजी : काय, म्हणतोस काय? पांच हजारांचं बक्षीस?

वासुदेव : होय. अगदीं रोकड. शिवाय वर चांदीचा तोडा इनाम.

विसाजी : (स्व.) तें सरकारी बक्षीस दोन हजारांचं. आन् हें बक्षीस पांच हजारांचं! अबब! दुपटीहून अधिक. मग हेंच मिळविण्याची खटपट केली पाहिजे.

सावित्री : पण बाबा, हें बक्षीस कशाबद्दल माहीत आहे का?

विसाजी : कशाबद्दल?

सावित्री : मुंबईच्या गव्हर्नरच्या मुंडक्याबद्दल!

विसाजी : काय, काय? गव्हर्नरसाहेबांच्या मुंडक्याबद्दल?

वासुदेव : होय. अगदीं टोपीसकट सर रिचर्ड टेंपलचं मुंडकं मला आणून द्यावं—

विसाजी : आन् स्वताचं मुंडकं गमावून बसावं! वा:! चांगलं बक्षीस म्हणायचं!

वासुदेव : आन् लागलीच पांच हजार रुपये घेऊन जावं! रोखठोक व्यवहार!

विसाजी : छट्, असलं नीच राक्षसी काम कोण करील! मला तर या कल्पनेनंच कांपरं सुटलं! साहेबांचं—त्यांतून गव्हर्नरसाहेबांचं मुंडकं! अरे बापरे! माझंच मुंडकं, कोणी तरी धडावरून दूर करतोय असं मला वाटतंय!

वासुदेव : पहा सावकार, जन्माची ददात नाहींशी होईल!

विसाजी : राजा म्हणजे विष्णूचा अंश ही आमची संस्कृति! आन् त्या राजाचं, नव्हे विष्णूचं शिरकमल—

सावित्री : तोडायचं, आन् स्वातंत्र्यदेवीच्या पायावर वहायचं!

विनायक : आणि पांच हजार रुपये जन्मभर मोजीत बसायचं!

विसाजी : नाहीं रे बाबा; असलं महापाप आपल्या बापाच्याही हातून होणार नाहीं.

विनायक : हें महापाप? आन् महाराजांना पकडून देऊन दोन हजार रुपयांचं बक्षीस उपटण्यासाठीं मात्र रानोमाळ भटकत फिरायचं!

सावित्री : हें मोठं सत्कृत्य नाहीं का ?

विसाजी : नाहीं. हेंसुद्धां वाईटच! पण राजवध आणि मनुष्यवध याच्यांत स्वाभाविकच फरक आहे. राजाचं रक्षण करणं हा प्रजेचा धर्म आहे.

वासुदेव : मुळींच नाहीं. जुलमी राजापेक्षां सरळपणानं वागणारा गरीब शेतकरी शतपट श्रेष्ठ होय. आन् म्हणून त्याच्या रक्षणाकरितां, तसंच असंख्य लोकांच्या शाश्वत कल्याणासाठीं, असुरवृत्तीच्या अन्यायी राजाचा शिरच्छेद केला तर त्यांत बिलकुल पाप नाहीं.

विसाजी : छे छे! काय याचे हे ज्वालाग्राही विचार! माथ्यांतील विचार-शक्तीच्या चिंधड्या चिंधड्या उडून जातात. आतां इथं राहण्यांत अर्थ नाहीं. डॅनिअल आल्यावर इथं खूपच घनचक्कर माजणार! आन् बक्षीस बाजूला राहून आपलं फुकट मरण मात्र ओढवणार. त्यापेक्षां शहाणपणाचा मार्ग म्हणजे आपण सरळ काढता पाय घ्यावा हें बरं! (जातो.)

वासुदेव : सावित्री, मीं मघाशीं तुला सांगितलं त्याचा पडताळा आला ना? मला पकडून देऊन देशद्रोह करायला सावकाराला शरम वाटत नाहीं. आणि गव्हर्नरच्या मुंडक्याची गोष्ट काढतांच मात्र, पापपुण्य, विष्णूचा अंश, धर्माधर्म इ. ब्रह्मज्ञान त्यांना सुचूं लागलं! असले देशद्रोही नराधम आमच्या देशांत आहेत, म्हणूनच परक्यांचे पाय या भूमींत रोवले गेले! (पडद्यांत—डॅनिअल—" कुठें हाय टो शैटाण! इंग्रजांचा शत्रू टो वासुडेव बळवंट कुठे हाय ?") या सिंहाचा भाग तो डॅनिअल आला. विनायक, सावित्री, तुम्ही शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन त्या वटवृक्षाआड दडून राहा. जरूर लागतांच मी हांक मारीन. [ते दोघे बाजूला होतात. डॅनिअल बंदूक रोखून आजूबाजूस पहात आस्ते आस्ते येतो.]

डॅनिअल : ओहो! वासुडेव बळवंट, शेवटीं सांपडलास माझ्या टावडींट!

वासुदेव : कोण कोणाच्या तावडींत सांपडलं आहे त्याचा लवकरच उमज पडेल!

डॅनिअल : वासुडेव बळवंट, टू इंग्रज सरकारचा गुन्हेगार आहेस!

वासुदेव : इंग्रज सरकारच माझं आणि साऱ्या प्रजेचं गुन्हेगार आहे!

डॅनिअल : टू लुटालूट करटोस, बेकायडा शस्त्रास्त्रं जमवून आणि भिल्ल रामोशांची फौज तयार करून जनतेला सरकारविरुद्ध बंड करायला सांगटोस; टसंच, टू पुण्यांटील वाड्यांना आगी लावून सरकारचं अटोनाट नुकसान केलं हायस.

वासुदेव : हा माझ्यावर वृथा आरोप आहे!

डॅनिअल : असल्या राजद्रोही बंडखोराला शासन केल्याशिवाय आम्हांला पीस अँड ऑर्डर राखणं मुष्कील झालं हाय!

वासुदेव : साहेब, मलासुद्धां जनतेचे हाल पहावत नाहींत; त्यांची अन्नान्न-दशा झालेली उघड्या डोळ्यांनीं पहावेना म्हणून मीं हा बण्डाचा मार्ग पत्करला आहे. लक्षावधि लोकांनीं अन्नासाठीं रात्रंदिवस तडफडत असावं आणि मूठभर गोऱ्यांनीं लठ्ठ पगार खाऊन ऐषआरामांत लोळत पडावं, असलं चीड आणणारं चित्र पाहून माझं माथं भडकून जातं, अंगाची आग आग होऊन जाते!

डॅनिअल : म्हणून टू आमच्या वाड्यांना आगी लावटोस? पण फूलीश फेलो, आगीनं आग विझट नसटे!

वासुदेव : भौतिक आग कशानं विझते हें मी जाणतों. पुण्याच्या आगी तुम्हीं पाणी आणि माती यांचा वर्षाव करून जरी तात्पुरत्या विझवल्या असल्या, तरी असंख्य जनतेच्या अंतःकरणांत, तुमच्या जुलमी राज्यकारभारा-विषयीं जो असंतोषाचा वडवानल भडकला आहे, तो पाण्यानं, मातीनं, किंवा या वासुदेव बळवंताला फांसावर चढवण्यानं कधींच विझणार नाहीं.

डॅनिअल : मग टो कशानं विझेल?

वासुदेव : स्वातंत्र्यानंच तो विझेल! म्हणजेच इंग्रजांच्या रक्ताच्या शिड-काव्यानंच तो अग्नि शमन होईल समजलांत साहेब!

डॅनिअल : ही टूझी मूर्खपणाची समजूट हाय. शिपायांच्या बंडाचा परिणाम काय झाला? नुसत्या हुल्लडबाजीनं स्वाटंट्र्य मिळत नसटे!

वासुदेव : ५७ चं क्रांतियुद्ध अयशस्वी झालं. पण त्यानं उत्पन्न केलेली प्रेरणा कायम राहिली. बंड फसलं तरी स्वातंत्र्याची स्फूर्ति अमर झाली.

तीच स्फूर्ति–तीच दिव्य प्रेरणा–हृदयाशीं बाळगून पुनश्च हरिः ॐ म्हणून या वासुदेव बळवंतानं इंग्रजाशीं झुंज आरंभली आहे.

डॅनिअल : नानासाहेब पेशव्याप्रमाणेंच टूझ्याही बंडाचा निकाल लागणार आहे. आणि एका वेडगळ, चुकलेल्या डेशभक्ताची वायफळ वळवळ, एवढाच निर्देश या डेशाच्या इतिहासांत केला जाईल. टुझ बंड म्हणजे नुसता पोरखेळ आहे.

वासुदेव : एवढा मी जर क्षुद्र प्राणी आहें, तर मग साहेब, नुसत्या माझ्या नांवानं गोऱ्यांच्या विजारी पिवळ्या कां होऊन जातात? आणि असल्या वळवळ करणाऱ्या वासुदेव बळवंतरूपी जिवाणूला पकडण्यासाठीं एवढं लष्कर, शेंकडो शिपाई आणि प्रचंड शस्त्रसामग्री गोळा करण्याची डॅनिअल साहेबांना जरूर कां पडावी? अर्थात्, हा वासुदेव बळवंत क्षुद्र वळवळ करणारा जिवाणू नसून गोऱ्यांच्या काळजाला कडकन् चावणारा अस्सल कोब्रा आहे!

डॅनिअल : शट अप्! मुकाट्यानं आमच्या स्वाधीन हो. नाहींतर गोळी झाडून ठार करीन टूला.

वासुदेव : जंगलांतले कवडे मारणं किंवा सशाची शिकार करणं सोपं असतं. पण या वासुदेव बळवंतावर गोळी झाडणं आपल्याला वाटतं तितकं सोपं नाहीं. हा दख्खनचा शेर वासुदेव बळवंत आहे साहेब! कवडा किंवा ससा नाहीं बरं!

डॅनिअल : टू आमाला शरण आलास टर टूझी फांशी चुकेल आणि साध्या शिक्षेवर टू सुटशील!

वासुदेव : शरण जाण्याची गोष्टच बोलूं नका साहेब. आणि फांशीलाही मी भीत नाहीं. प्राणांची तमा आम्ही स्वातंत्र्यवीर कधींच बाळगीत नाहीं. ज्यावेळीं या वासुदेव बळवंतानं बंडाचा झेंडा उभारला, त्याच वेळीं त्यानं हुतात्म्याची दीक्षा घेऊन, पंचप्राणांचं प्रस्थान बाजूला काढून ठेवलेलं आहे.

डॅनिअल : ओ! व्हॉट ए वंडरफुल डेअर डेव्हील!

वासुदेव : तुम्ही पकडून अन्यायानं मला फांसावर चढवलंत, तर मी निर्भयपणें गीतेचे श्लोक मनन करीत, बोहल्यावर चढल्याप्रमाणं आनंदानं

फांशीची शिडी चढून जाईन! पण त्यापूर्वी शेंपन्नास गोऱ्यांना लोळवल्या-शिवाय मात्र राहणार नाहीं हें ध्यानांत ठेवा.

डॅनिअल : या माठेफिरूला ठार करण्यावांचून गत्यंटर नाय. चल हुश्शार! (तो बंदुकीचा नेम धरतो. वासुदेव बळवंत झटकन् एका दगडाआड लपतो.) अरे किधर गायब हो गया? वासुडेव बळवंत, टूं शेर आहेस ना? मग असा भ्याडासारखा पळून कां गेलास? चल, असा पुढं ये. (तो पुढं पुढं जातो. इतक्यांत 'जय यळकोट मल्हार' म्हणून गर्जना होते. त्यासरशीं विनायक, सावित्री, दौल्या, खौल्या वगैरे रामोशी बंदुका, भाले, तिरकामठे घेऊन येतात व त्याला चोहोंबाजूनं घेरतात. तो आश्चर्यचकित होतो.)

वासुदेव : साहेब, शेवटीं कोणीं कुणाला पकडलं?

डॅनिअल : नो डाऊट; हा खरोखरच 'टायगर ऑफ महाराष्ट्र' 'लायन ऑफ डेक्कन' हाय!

अंक २ रा समाप्त

३

प्रवेश पहिला

[स्थळ—गुलबुर्ग्याजवळील हैद्राबाद संस्थानांतील सय्यद अबदुल हक्चें निवासस्थान. त्यानं पकडून आणून स्थानबद्ध केलेली **सावित्री** विषण्ण मनानं चिंताक्रांत अवस्थेत बसली आहे.]

सावित्री : काय पहा दुर्दैव ओढवलं आम्हां बहीणभावावर! त्या दिवशीं डॅनिअल साहेबांची ती तशी फजिती केल्यावर, महाराजांच्या आज्ञेवरून आणि मीं हट्ट घेतला म्हणून, त्या थोर पुरुषाच्या साध्वी पत्नीच्या दर्शनासाठीं, आम्ही उभयतां जुन्नरास चाललों होतों. पण मध्येंच चाकणच्या खिंडीजवळ, आमच्या पाळतीवर असलेल्या त्या मेल्या अबदुल्यानं, अवचित छापा घालून आम्हांला गिरफदार केलं आणि या निजाम हद्दींतल्या स्वतांच्या वाड्यांत नजरकैद करून ठेवलं आहे. दादा आन् मी एकत्र असतों, तर मला धास्ती वाटली नसती. पण आम्हां दोघांची ताटातूट करून, त्या दुष्टानं आपल्या नीच कर्माची परिसीमाच गांठली आहे जणुं काय! विनायकदादाची मला काळजी, आन् माझ्याबद्दल त्याला सतत चिंता; अशी मोठी चमत्कारिक दुःखदायक वेळ येऊन ठेपली आहे. देवा! माझ्या कितीही हालअपेष्टा झाल्या, कशाही दुर्धर यातना सोसाव्या लागल्या तरी चिंता नाहीं. पण त्या थोर पुरुष वासुदेव बळवंतांना मात्र सुखी ठेव. त्यांच्या पवित्र ध्येयाची पूर्ति होऊन आमच्या देशाला स्वातंत्र्याचा लाभ होवो; आणि गोऱ्यांचं रावणराज्य लयास जावो, एवढीच या अगतिक अबलेची तुझ्या चरणीं प्रार्थना आहे.

सावित्री—

विजयी करीं विश्वंभरा, देवा, वासुदेवा । विनवी तव चरणीं, धरुनि सद्भावा ॥धृ०॥ पारतंत्र्यतमा नाशायाला। उदयाचलीं हा, भास्कर आला ॥१॥ सफल करीं झडकरी, उत्थानाला। यश, दीर्घायुष अर्पि तयाला ॥२॥

अबदुल : आहे ना तुझ्या दादाची संमति? तुझी माझी शादी झाली म्हणजे त्याची कैदेंतून सुटका झालीच म्हणून समज. (एक शिपाई घाईघाईनं येतो.)

शिपाई : साहेब, साहेब, तो सावकारपुत्र विनायक—

अबदुल : त्याचं काय झालं? तो मेला कीं काय?

शिपाई : नाहीं साहेब. तो कोठडीचे गज तोडून, बारा फूट उंचीची तुरुंगाची भिंत ओलांडून फरारी झाला!

सावित्री : (हर्षानं) जीते रहो माझा विनायकदादा!

अबदुल : फरारी झाला! तो बदमाष, या अबदुलचं नाक कापून नाहींसा झाला? जा, जा. त्याचा शोध करून त्याला पकडून आणा. (शिपाई जातो.) प्यारी, तूं कांहीं चिंता करूं नकोस! तूं माझी बेगम झालीस म्हणजे त्या साल्याला मी शोधून काढून सन्मानानं घेऊन येईन. दिलखुष पांखरा, ये, अशी जवळ ये.

सावित्री : कशाला जवळ ये? तुझ्या नरडीचा घोट घ्यायला?

अबदुल : नहीं नहीं, इष्काचा मजा लुटायला! तूं माझी बेगम आहेस! जनानखान्यांत भय किंवा लाज बाळगण्याचं कारण नाहीं—तुला अशी जवळ ओढून—

सावित्री : हां खबरदार. कामांधपशो मागं सर.

अबदुल : मागं सर? तूं कोण मला हुकूम करणार?

सावित्री : मी कोण? मी तुझी मय्या! त्या दिवशीं तूं मला आपली आई म्हणून माझ्यापुढं नाक घांसलं आहेस. आठवण आहे ना?

अबदुल : अंः! ती केवळ प्राणरक्षणासाठीं केलेली बतावणी होती. आणि शराबीनं मस्त बनलेले आमच्यासारखे खरे इष्कबाज, फक्त मर्द और औरत एवढं एकच नातं ओळखत असतात. इतर नात्यागोत्यांचा आम्ही नाश्ता करून टाकतों. इष्कापुढं दुनियेंतल्या बाकीच्या साऱ्या गोष्टी तुच्छ आहेत.

इष्क का है ये जमाना। दिल दिवाना हो गया।
यार तेरा मैं बनूंगा। दिल चमनमें मश्गुल रहूं॥

सावित्री : मदिरेची धुंदी आणि कामवासनेचा कैफ, स्वारीच्या डोळ्यांवर चढल्यामुळं, हा या वेळीं साक्षात् पशु बनला आहे!

अबदुल : प्यारी, ये; मेरे गलेमें पड जाव. पण तुम्ही बायका मोठ्या अडेलतट्टू असतां. प्रेमाच्या लढाईत पुरुषांनीं प्रथम सुरुवात करावी ही तुमची इच्छा असते. म्हणून तुझा अस्सा हात धरून (तो तिचे दोन्ही हात धरून तिला जवळ ओढतो. ती बळ करून आपला एक हात सोडवून घेते व श्रीमुखांत भडकवते.) थुत तेरी! प्यारीनं लप्पड लगाई! मेरी इज्जत खराब कर दिई!

सावित्री : अधमा, वेळींच शुद्धीवर ये आणि मला छेडण्याचा नाद सोडून मुकाट्यानं चालता हो.

अबदुल : बदतमीज बेटी, तुम्ही हिंदु पोरी सरळपणानं वश होत नाहीं हें मला माहीत आहे!

सावित्री : माणुसकीला मुकलेल्या या राक्षसाना आतां नाश करण्यावांचून गत्यंतर नाहीं.

अबदुल : तुमच्यासारख्या हट्टी पोरी, बलात्कारानंच उपभोगाव्या लागतात.

(घट्ट पदराच्या आड पोटाशीं लपवलेलं पिस्तुल बाहेर काढते.)

सावित्री : दादाच्या आज्ञेप्रमाणं दुष्टाच्या हननासाठीं मला या शस्त्राचा उपयोग करायला नामी संधि मिळाली!

अबदुल : मस्तवाल छोकरी–(असं म्हणून तो सावित्रीवर झडप घालणार, तोंच ती हातांतील पिस्तुलाचा चाप खेचते. पिस्तुलाची गोळी अबदुलच्या छातींत घुसून तो खालीं पडतो.) मार डाला! ये हिंदु छोकरीनं मुझे सच-मुच मार डाला! (मरतो.)

सावित्री : आतां मला इथून लवकर निसटलं पाहिजे. (जाऊं लागते. पण कांहीं विचार मनांत येऊन मागें फिरते.) पण हें पिस्तुल बरोबर नेण्यापेक्षां इथंच टाकणं बरं! त्यामुळं हा अधम आत्महत्या करून मेला असा सर्वांचा समज होईल. आणि खुनाच्या आरोपांतून आपण सहीसलामत सुटूं. (पिस्तुल तिथंच टाकून ती त्वरेनें निघून जाते.)

प्रवेश दुसरा

[स्थळ—नदीचा रस्ता. पुढं सीता आणि तिच्या मागं हातीं तिरकमठा घेऊन रामा प्रवेश करतात.]

रामा : बोल माझी बायको होतेस कीं नाहीं ? नाहींतर अचुक तीर सोडून तुझा बुचडा अस्मानांत उडवीन !

सीता : पण रामा, तूं पट्टेवाला—साहेबाचा नोकर.

रामा : मी साहेबाच्या नोकरीला रामराम ठोकला आहे ! आणि तुला आवडणारा भिल्ल बनलों आहें !

सीता : बायको मिळवण्यासाठीं तुम्हीं पट्टेवाल्याच्या नोकरीवर पाणी सोडलंत.

रामा : अग बायकोसाठीं सर्वस्वावर पाणी सोडावं लागतं ! मग साहेबाच्या नोकरीची काय कथा ? या सीतेसाठीं हा राम धनुर्धर बनला आहे !

सीता : पण नुसता तिरकमठा घेतला, म्हणजे भिल्लाचा पराक्रम आणि त्याचं तिरंदाजीचं कसब तुम्हांला थोडंच साधणार आहे ?

रामा : या रामा भिल्लाचं कसब पहायचंय् तुला ? अशी जोगेश्वरीसारखी स्थिर उभी राहा.

सीता : हां. ही उभी राहिलें ! (ती दगडी मूर्तीप्रमाणं उभी राहते.)

रामा : आतां मी अचुक तीर सोडून तुझा अंबाडा गंगावनासकट अस्मानांत उडवतो पहा ! ! (तिरकमठ्यावर तीर चढवतो.)

सीता : (घाबरून) अगबाई, म्हणजे बामणावाणी मला सोवळी करतोस कीं काय ?

रामा : घाबरूं नकोस. तें हजामाचं काम हा धनुर्धर राम कशाला करील ? तुझा अंबाडा क्षणभर जरी डोईपासून दूर झाला, तरी घाबरण्याचं कारण नाहीं. कौरव पांडवांच्या खेळांतली विटी, द्रोणाचार्योनीं जशी बाणांनीं विहिरींतून वर काढली, त्याचप्रमाणं वावडीप्रमाणं वर गेलेला तुझा अंबाडा दुसरा तीर मारून, तुझ्या डोईवर पूर्वीसारखा आणून बसवीन, समजलीस.

सीता : तिरंदाजीच्या कसबापेक्षां बोलण्याचंच कसब तुम्हांला चांगलं साधलेलं दिसतंय् मला !

रामा : चल, म्होतूराला तयार होतेस का सोडूं तीर तुझ्या छाताडावर!

सीता : अगदीं राक्षसाचाच अवतार धारण केला हाय तुम्हीं!

रामा : मग काय करावं या रामानं? तुळशीबागेंतल्या दगडाच्या रामा-भोंवतीं, त्याची इच्छा नसतांना बायकांचा वेढा पडतो, आणि हा चांगला चालता बोलता राम बायकांना आपल्या जवळ करायला पहातो, तर त्या माझ्या वाऱ्यालाही उभ्या राह्यला तयार नाहींत!

सीता : साहेबापुढं हांजी हांजी करणारा आणि बायकांचे बुचडे उडवणारा असला बायकी राम कोणती जानकी पत्करील बाई!

रामा : जानकी नाहीं पण सीतेला पत्करायला काय हरकत आहे? एकूण काय, ज्यांना जें नको तें हमखास मिळायचं. आणि ज्यांना ज्याची जरूर, तें त्यांना जन्मांत लाभायचं नाहीं. हा ईश्वराच्या घरचा विचित्र न्याय आहे? दुसरं काय!

सीता : चला, तुमच्याजवळ बोलत बसायला मला वेळ नाहीं. घरीं जाऊन मला भाकऱ्या भाजायच्या आहेत. बाबा आतां कामावरून येतील!

रामा : हो हो तर! कांहींतरी निमित्त काढून पळून जाण्याचा तुझा विचार दिसतोय? तुम्ही बायका म्हणजे मोठ्या निमताळ्या असतां. मनांत नसलं किंवा मनांत जरी असलं, तरी वरकरणीं जाण्याचा बहाणा करून, पुरुषांच्या आवतींभोंवतीं घोटाळत असतां तुम्ही छटेल पोरी!

सीता : खरंच, मला घरीं गेलं पाहिजे.

रामा : मला गुंगारा द्यायला पहातेस? पण हा राम फसणार नाहीं. मी साहेबाचा पट्टेवाला होतों, तेव्हां तुझ्या गुळचट भाषणांनीं मी लागलीच नरम पडत असें. पण आतां मी गरम झालों आहें गरम! मी हा भिल्लाचा पेशा पत्करल्यापासून, रानांतल्या पांखरांची आणि शहरांतल्या तुझ्यासारख्या रंडक्या बायकांचीं अंडीपिलीं, मला चांगलीं उमगायला लागलीं आहेत!

(वेड्याच्या स्थितींत विसाजी येतो.)

विसाजी : पांच हजार रुपये! मला मिळणार! अरे, कोणीतरी मला गव्हर्नरचं ठिकाण दाखवा रे! अरे, कोणीतरी माझ्या हातांत तरवार द्या रे. तरवार मिळाली म्हणजे दबत दबत जातों, तरवारीनं या कानापासून त्या

कानापर्यंत टेंपल साहेबाचं मुंडकं तोडतों आणि वासुदेव बळवंतकडून पांच हजार रुपये मिळवतों. (मोठ्यानं हंसतो.) हाः हाः हाः पांच हजार! अबबब! पांच हजार! मला पांच जन्म पुरतील!

रामा : अरेरे! सावकाराचं सर्वस्व गेल्यामुळं बिचाऱ्याला वेड लागून काय ही त्याची दशा झाली आहे!

सीता : कोण हा वेडगळ प्राणी?

रामा : हा माझा एकेवेळचा आश्रयदाता आहे. धनी, काय ही आपली अवस्था!

विसाजी : बरा सांपडलास! तुझंच मुंडकं मला पाहिजे आहे! तुझी ती तरवार आण पाहूं इकडे. तुझ्याच तरवारीनं तुझं मुंडकं तोडतो!

सीता : ती तरवार नाहीं. तिरकमठा आहे! तिरकमठा!!

विसाजी : काय शेतकऱ्याचा अंगठा आहे हा! अंगठा! अंगठा!! अडाणी शेतकऱ्यांचे नुसते अंगठे घेऊन मीं त्यांना भिकेला लावलं! कित्येकांना त्यांच्या भरल्या घरातून, आसन्नमरण स्थितींत खाटल्यावरून ओढून काढून रस्त्यावरच्या धुळींत फेकून दिलं! अन्नपाण्यावांचून तडफडणाऱ्या, शेंकडों गोरगरिबांच्या चिमण्या अर्भकांना, केवळ द्रव्यलोभानं थंडीवाऱ्यांत आणि पावसाच्या माऱ्यांत या विसाजीनं निर्दयपणानं ढकललं आहे! गेलं, माझं सर्वस्व गेलं! गोरगरिबांचे शाप मला चांगलेच बाधले! मी आतां भणंग भिकारी बनलों!

रामा : धनीसाहेब, चिंता करूं नका; मी तुम्हांला शेवटपर्यंत सांभाळीन.

विसाजी : मला कोण कशाला संभाळायला हवा. माझं पांच हजारांचं बक्षीस माझा जन्मभर सांभाळ करील, समजलास!

रामा : आली पुन्हा वेडाची लहर!

विसाजी : तूं मुंबईचा गोरा गव्हर्नर आहेस?

रामा : नाहीं धनी. मी आपला पूर्वीचा नोकर रामा मालुसरे आहे!

विसाजी : माझा नोकर! छे रे. मीच तुझा नोकर! तानाजी मालुसरे केवढा म्हणजे मर्द गडी! तो माझा नोकर? छे! त्याच्या पायपोसाची तरी सर आमाला

आहे का? (सीतेला) मग काय रे, तूं तरी मुंबईचा टोपीवाला आहेस का?

सीता : मी टोपीवाला? रामा, तुझे धनी मला टोपीवाला समजतात!

रामा : छे छे धनीसाहेब, ती टोपलीवाली आहे! टोपलीवाली गव्हर्नर कशी होईल!

विसाजी : काय तुम्ही दोघेही गव्हर्नर नाहीं?

रामा : आम्ही नवराबायको आहोंत.

सीता : हें हो काय? मीं अजून होकार कुठं दिला आहे?

रामा : पण नकार तर नाहीं ना? शिवाय वेड्याला खऱ्याखोट्यांतील किंवा नवराबायकोमधील भेद मुळींच कळत नसतो.

विसाजी : अरे, मला कोणीतरी मुंडकं द्या रे! मुंडकं मिळालं तर काय बहार होईल!

सीता : मुंडकं कांहीं नाहीं, पण तुम्ही घरीं याल, तर मीं भाजलेलं मडकं बरीक तुम्हांला देईन!

विसाजी : मडकं कशाला? तुझ्या तिरडीपुढं धरायला?

रामा : हां हां धनीसाहेब, ती माझी बायको आहे. तिच्यापुढं मडकं धरण्याचा अधिकार माझा आहे.

विसाजी : मग काय, तुझ्या तिरडीपुढं? मला मुंबईच्या गव्हर्नरचं टोपी-सकट मुंडकं पाहिजे आहे. म्हणजे मला पांच हजारांचं बक्षीस मिळणार आहे.

रामा : पण धनीसाहेब, आपण तर महाराणी व्हिक्टोरियाच्या तसबिरीची नित्य पूजा करणारे कट्टर राजनिष्ठ सावकार! आणि आतां खुद्द गव्हर्नरच्या मुंडक्यासाटीं धडपडतां? कुठं ती दिव्य राजनिष्ठा! आणि कुठं हा भयंकर राजद्रोह!!

विसाजी : माझी राजनिष्ठा वांझोटी ठरली! राजनिष्ठेपायीं वाशाचा दरोडा पडला. म्हणून साहेबाकडे दाद मागायला गेलों. तर त्यानंच उलट मला सूर्याचीं पिलं दाखवलीं! मी निर्धन बनलों! म्हणून पांच हजारांचं बक्षीस मिळवण्याचा मीं निर्धार केला आहे. राजनिष्ठेप्रमाणंच हा राजद्रोहही वांझोटा ठरला नाहीं म्हणजे मिळवली!

रामा : वेड्याची प्रत्येक कृतीच वांझोटी ठरत असते!

विसाजी : अरे तो पहा, त्या झाडावर गव्हर्नर बसला आहे. तो काय खातोय बरं मचाक मचाक! हां हां ताडगोळे! अरे गुलामा, मी मुंडकं तोडीन म्हणून मला झुकांडी देऊन एकीकडे गुपचूप झाडावर बसून ताडगोळे खात बसला आहेस काय? रामा रामा, तो पाहिलास का तांबड्या तोंडाचा गव्हर्नर!

रामा : धनीसाहेब, तो गव्हर्नर नाहीं. तें तांबड्या तोंडाचं माकड आहे!

विसाजी : 'माकडा माकडा हुप्प, तुझ्या शेंडीला शेरभर तुप्प!'

रामा : त्याचं मुंडकं तुम्हांला चालत असेल तर पहा.

सीता : हो. तांबड्या तोंडाचं माकड काय आणि तांबड्या तोंडाचा गोरा साहेब काय, दोन्हीही सारखेच!

रामा : एक वनचर आणि दुसरा जलचर एवढाच फरक काय तो दोघांत.

विसाजी : तो पहा मला वांकुल्या दाखवतो आहे. थांब रांडलेका. तुझंच मुंडकं कापून नेतों, आणि त्या वाशाकडून बक्षीस उपटतों. हाः हाः हाः पांच हजार पांच हजार रुपये, टोपीवाल्याच्या मुंडक्यासाठीं बक्षीस मिळवणार! हा विसाजीच तें मिळवणार! सावित्रीला तें मिळणार नाहीं. विन्याला तें मिळणार नाहीं. हाच गब्रू तें मिळवणार! (हंसत जातो.)

रामा : हर हर! या वेडापायीं सावकाराची काय गति होणार कांहीं समजत नाहीं. सीते, पाहिलास ना वेडाचा परिणाम!

सीता : काय तरी बाई विचित्र वेड! म्हणे गव्हर्नरचं मुंडकं पाहिजे. ती काय परसांतली भाजी आहे का उकिरड्यावरची धूळ आहे!

रामा : सीते, हा सावकार धनवेडा, तो अबदुल प्रेमवेडा, वासुदेव बळवंत स्वातंत्र्यवेडा, मी बाईलवेडा आणि तूं रामवेडी! मिळून काय, जगांत प्रत्येक जण आपापल्या वेडाच्या लहरींत सदा असतो. थोडक्यांत सांगायचं, म्हणजे जग ही वेड्यांची प्रचण्ड धर्मशाळा आहे!!

सीता : सारेच वेडे असून, एक दुसऱ्याला हंसतो व नांवं ठेवतो, ही और गंमत आहे नाहीं का रामभाऊ!

रामा : रामभाऊ! भाऊ! मी तुझा दादला बनून संसार सुरू करायचं पहातोंय् तर तूं आपली रामभाऊ म्हणून साथ घालून, भाऊबीज साजरी

करायला बघतेस ? हें बघ सीते, तूं मला राम्या म्हणालीस तरी चालेल ! पण रामभाऊ म्हणून माझा पाणउतारा करूं नकोस !

सीता : पण काय हो रामचंद्रबुवा—

रामा : पुन्हा तेंच ! भाऊ गेला आणि बुवा आला. बुवा म्हटला म्हणजे, दाढी वाढली आहे, चेहऱ्यावर राख चोपडली आहे, अंगांत कफनी आणि ढुंगणाला लंगोटी, अशी संसाराची राखरांगोळी केलेली, वैतागलेली व्यक्ति डोळ्यांपुढं उभी राहते. माझ्या ठिकाणीं तुला यांपैकीं एखादं चिन्ह दिसतंय का ?

सीता : रामभाऊ नको, रामचंद्रबुवा नको; मग तुम्हांला हांक तरी कशी मारायची ?

रामा : नवराबायकोनीं नांवं घेऊन हांक मारायची नाहीं. त्यासाठीं अहो आणि अग, या शब्दांची आपल्या पूर्वजांनीं सुरेख सोय करून ठेवली आहे.

सीता : अहो; अहो तुम्ही ?

रामा : हां. अस्सं अस्संच ! किती मौज वाटते बरं ?

सीता : काय हो ? अहो ?

रामा : काय म्हणतेस ग ? अग, तुझं काय म्हणणं आहे ग ?

सीता : या वासुदेव बळवंताच्या बंडाचा शेवट चांगला होईल कीं वाईट होईल ?

रामा : चांगला आणि वाईट दोन्ही प्रकारानं होणार.

सीता : दोन्ही प्रकारानं ! म्हणजे कसा हो ?

रामा : कसा तो सांगतों ऐक. बलाढ्य इंग्रज सरकार त्याच्या बंडाचा बीमोड करून, त्याला फांसावर चढवणार हें अगदीं ठरलेलं आहे.

सीता : अगबाई ! त्याला फांसावर चढवतील ?

रामा : मग काय ? त्याला सोन्याच्या अंबारींतून मिरवतील ? अग इंग्रजांची सत्ता उलथून पाडणाऱ्या, असल्या भयंकर राजद्रोही माणसाला, फांशी किंवा जन्मठेप ही शिक्षा दिल्यावांचून इंग्रज सरकार राहणार नाहीं.

सीता : होय हो होय. उमाजी नायकाला या टोपीवाल्यांनीं म्हणे फांसावरच चढवला होता.

रामा : मग सांगतों काय? गोऱ्यांच्या राज्यांत आपपरभाव नाहीं. रांगडा उमाजी नाईक असो, रणशूर तात्या टोपे असो किंवा शिकलेला वासुदेव बळवंत असो, सारे फांशीचे धनी! एवढा थोर देशभक्त फांशीं जाणार, ही वाईट गोष्ट आहे.

सीता : आणि चांगली गोष्ट कोणती तें सांगा पाहूं?

रामा : चांगली गोष्ट ही कीं, यापुढं 'हम करे सो कायदा' या मग्रूरीनं राज्यकारभार न करतां, इंग्रज सरकार प्रजेच्या हिताच्या दृष्टीनं, प्रजेच्या कलानं आणि नरमाईनं राज्याचा गाडा हाकूं लागतील!

सीता : चांगलं अंजन पडेल मेल्यांच्या डोळ्यांत!

रामा : बोल, माझी बाईल होतेस कीं नाहीं तें! मी कुठंही वाहवत गेलों तरी बायकोचा मुख्य विषय सोडणार नाहीं. बोल, केव्हां म्होतूर करायचा?

सीता : मी तुमची बायको होईन. पण एका अटीवर?

रामा : तुझी काय अट आहे?

सीता : मी तुमची बाईल झाल्यावर, तुम्ही मरेपर्यंत दुसऱ्या कोणत्याही स्त्रीशीं बोलायचं नाहीं कीं वाकड्या नजरेनं पहायचं नाहीं. नाहींतर जाल त्या राधेबरोबर गुलगुल गोष्टी बोलायला!

रामा : राधेबरोबर रामानं गुलगुल गोष्टी केल्याचं पुराणकालीं कधीं घडलं नाहीं मग आतांच कसं घडणार! हा तुझा केवळ संशय आहे. बरं काय म्हणतेस, तुझ्याशिवाय कोणत्याही स्त्रीशीं—

सीता : मरेपर्यंत बोलायचं नाहीं.

रामा : पण कोण मरेपर्यंत? ती स्त्री, तूं कीं मी?

सीता : आपणां दोघांपैकीं कुणीही मरेपर्यंत.

रामा : माझी आई देवाकडे गेली, बहीण तर मला नाहींच! अग, पण हो. तुझा माझा म्होतूर होऊन, पांडुरंगाच्या कृपेनं, वर्षाच्या आंत, आपल्याला एखादी फट्दिशीं मुलगी झाली, तर तिच्या जवळसुद्धां मी बोलायचं नाहीं का?

सीता : मुलीजवळ बोलूं नका म्हणून कोणीं सांगितलं तुम्हांला? फक्त स्त्रियांशीं बोलायचं नाहीं.

रामा : मुलगी ही स्त्री नाहीं बरं का ! हें बघ, मी तुझी ही अट अक्षरशः पाळीन. पण तूंसुद्धां पूर्ण पतिव्रताधर्मानं वागशील ना ? नाहींतर मंडईंत जातांना त्या कोपऱ्यावरच्या तांबोळ्याला, हळूच डोळ्याच्या कोपऱ्यांतून खूण करायचीस ! तसं कांहीं दिसलं मला तर तुझा तो खुणेचा डोळाच फोडून टाकीन !!

सीता : रामा शपथ, मी अगदीं सीतामाईसारखी वागेन.

रामा : मग तुझ्या गळ्या शपथ, मी एकपत्नी रामरायाप्रमाणंच वागेन ! शस्त्राशिवाय राज्य मिळत नाहीं, तशीच शस्त्राशिवाय बायको मिळत नाहीं. त्या रामानं धनुष्य मोडून सीता मिळवली, तर या रामानं धनुष्य जोडून बायको मिळवली ! चल लवकर. म्होतूर उरकून जोडप्यानं जोगेश्वरीच्या दर्शनाला जाऊं या.

(जातात.)

प्रवेश तिसरा

[स्थळ—कलादगी जिल्ह्यांतील देवरनावडगी गांवाजवळील डोंगरांमधील एक जुनाट बुद्धविहार. ओबडधोबड बुद्धाचे मूर्तीपुढं एक पणती मिणमीण जळत आहे. रात्रीचे नऊ वाजायची वेळ. कांहीं प्रवासी आजूबाजूस झोपले आहेत. श्रांत अवस्थेंत विनायकाचा आधार घेऊन वासुदेव बळवंत धीमे धीमे पावलं टाकीत येतात. यावेळीं त्यांचा पोषाख म्हणजे, सुरवार, कफनीवजा घोळदार अंगरखा व डोक्यास कानावरून बांधलेला सफेद फेटा येणेंप्रमाणें असतो.]

विनायक : महाराज, सोजीरांना झुकांड्या देत, या गांवाहून त्या गांवाला अशा धांवपळीनं, आपण कमालीचे थकून गेलां आहांत. तापानं अंग फणफणलं आहे. तेव्हां या ठिकाणीं थोडी विश्रांति घ्यावी.

वासुदेव : विनायक, ध्येयवादी पुरुषाला फक्त एकदांच विश्रांति उभ्या जीवनांत मिळत असते. आणि ती, या जड देहाचा त्याग करून ईश-ज्योतींत विलीन झाल्यावरच !

विनायक : नका महाराज. असं कांहीं बोलून या विनायकचा धीर खचवूं नका! बसा थोडा वेळ या ठिकाणीं. ही बरी निवांत जागा आहे. या बाजूस टोपीवाले सोजीर येण्याचा संभव नाहीं.

वासुदेव : अरे बाबा, काळ जसा माणसाच्या मागं त्याच्या नकळत वावरत असतो, त्याप्रमाणं मी कुठंही गेलों तरी माझ्यामागचं सोजीरांचं सुदर्शनचक्र सुटणार नाहीं. आपल्या उत्थानकार्याला भौतिक सामर्थ्याबरोबरच ईश्वरी सामर्थ्याचं पाठबळ असावं, म्हणून मीं स्वेच्छेनं अज्ञातवास पत्करला; आणि 'काशीकरबाबा' या नांवानं श्रीक्षेत्र गाणगापुरास राहून, माझं उपास्य दैवत श्रीदत्तात्रेय याचं मीं एकाग्र मनानं अनुष्ठान आरंभिलं!

विनायक : होय. ही बातमी मला कळली. आणि म्हणून तर मी तुरुंगांतून निसटतांच सरळ गाणगापुरास आलों. बिचाऱ्या सावित्रीची मात्र त्या दुष्टानें काय अवस्था केली असेल परमेश्वराला माहीत!

वासुदेव : ती मोठी धाडसी मुलगी आहे. त्या दिवशींचा तो प्रसंग माझ्या नजरेसमोर नाचतो आहे. असुरमर्दिनी दुर्गेचाच संचार त्यावेळीं तिच्या ठाईं झाला असावा.

विनायक : मीं तिला दिलेलं पिस्तुल जर तिच्याजवळ असेल—

वासुदेव : तर त्याचा योग्य उपयोग करून ती सुरक्षितपणें संकटमुक्त झाल्याशिवाय खात्रीन राहाणार नाहीं. गाणगापुरास माझं अनुष्ठान कांहीं दिवस निर्वेध चालू होतं. पण माझ्या दुर्दैवानं डॅनिअलला माझा सुगावा लागला, आणि त्यानं माझा पाठलाग सुरू केला. तेव्हां त्याला चुकवण्यासाठीं आज विजापूर तर उद्यां पंढरपूर अशा झुकांड्या देत, केवळ धांवपळीचं जिणं आपण जगतों आहोंत!

विनायक : महाराज, परमेश्वर तरी असा कसा पक्षपाती! अन्यायानं सत्ताधीश बनलेल्यांना, तो विपुल ऐश्वर्य, अमर्याद बळ आणि दीर्घायुष्य देतो. आणि न्यायनीतीनं चालणाऱ्या, आणि अहोरात्र राष्ट्राला दास्यमुक्त करण्यासाठीं झटणाऱ्या, आपल्यासारख्या महात्म्यांना मात्र, असा वनवास भोगण्याची पाळी आणतो. गरीबांचा काळ आणि माजोऱ्यांचा प्रतिपाळ बनलेल्या परमेश्वराला, शिव्याशापांची लाखोली वहावी असं मला वाटतं.

वासुदेव : यांत परमेश्वराकडे मुळींच दोष नाहीं. 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' असं गीतेमध्यें त्यानं स्पष्ट सांगितलं आहे. विनायक, कर्म-फलाप्रमाणें सुखदुःखाचे भोग माणसाला प्राप्त होत असतात! आणि म्हणूनच माझ्या कार्यात अखेर अपयश आलं तरी मी कष्टी होणार नाहीं. कारण मी कट्टा कर्मयोगी आहें. फलाची इच्छा न करतां, निष्ठापूर्वक स्वधर्मानुसार अखंड कर्म करीत राहा, हा एकच आदेश आमच्या हृदयांत सतत जागृत असतो.

विनायक : महाराज, आपण आतां स्वस्थपणानं पडावं. मी आपलं अंग रगडतों. म्हणजे धांवपळीनं आलेला थकवा जरा कमी होईल.

वासुदेव : धांवपळ माझी एकट्याची थोडीच झाली आहे? विनायक, तूंसुद्धां दमला आहेस. माझं अंग रगडण्याचे श्रम तुला देणं, म्हणजे आधींच थकलेल्या तुझ्या शरीराला अधिक ताण देणं होय. त्यापेक्षां तूंही विश्रांति घ्यावीस हें बरं! तो कमंडलू इकडे आण पाहूं! घसा कोरडा पडला आहे. थोडं पाणी पिऊन मी झोंपतों. (विनायक कमंडलू आणून देतो. तो त्यांतील पाणी पितो. विनायक त्याचं अंथरूण घालून देतो व आपणही शेजारींच अंथरूण घालून त्याच्यावर पडतो.) हर हर! माझ्या देशाला परक्याच्या गुलामगिरींतून मुक्त करण्याचं माझं सुखस्वप्न, लागोपाठ येणाऱ्या अपयशाच्या अंधारांत लोपून जाणार? पण नाहीं. सत्कृत्य कधींही निष्फळ होत नाहीं. मीं पेटवलेली स्वातंत्र्याची ज्योत, भावी देशभक्तांना मार्गदर्शन करून त्यांच्याकरवीं, भारताच्या स्वातंत्र्याचं महान् कार्य पार पाडल्यावांचून राहाणार नाहीं. (भवाच्या भयें काय भीतोस लंडी। धरी रे मना धीर धाकासि सांडी ॥ रघुनायकासारिखा स्वामि शीरीं। नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥ हा समर्थांचा श्लोक म्हणून कमरेची समशेर काढून जवळ ठेवतात व अंगावर शाल घेऊन झोंपतात. अतिश्रमानें त्या दोघांनाही तात्काळ झोंप लागते. थोड्या वेळानं हातांत चोर-कंदील घेऊन, दबत दबत डॅनिअल येतो.)

डॅनिअल : वासुडेव बळवंट या मंदिरांत शिरला हाय म्हणून गुप्तहेरानं खबर दिली हाय. चोहोंकडे सशस्त्र नाकेबंदी केली असल्यामुळं टो इठून

पळून जाणं अशक्य हाय. आज त्या शेराला पकडल्याशिवाय मी खाट्रीनं राहाट नाय. (कंदिलाच्या उजेडांत तिथं झोपलेल्या प्रवाशांचे चेहरे न्याहाळतो. नंतर वासुदेव बळवंताजवळ येतो.) हा आहे का वासुडेव बळवंट? पण छे, हा कोणीतरी मुसलमान असावा! याचा पेहराव मुसलमानाप्रमाणं हाय. टवा हा तो बंडखोर खात्रीनं नाय. (दूर जातो व विनायकाचा चेहरा पहातो.) छे, हा पण नाय. मग टो बडमाप गेला कुठं? कां इथूनही झुकांडी देऊन तो फरारी झाला? या दरोडेखोरानं आम्हांला अगदीं हैराण करून सोडलं हाय! टो फांसावर चढेल टेव्हांच आम्हाला शांटी मिळनार! (पुन्हां वासुदेव बळवंताजवळ येऊन बारकाईनं निरीक्षण करतो.) हा मुसलमान? नाय नाय. मुसलमान हिंदूंच्या मंदिरांट येणं शक्य नाय! ही याच्याजवळ तरवार हाय? टवा हाच तो हरामखोर वासुडेव बळवंट असावा. पण हा जागा नाय ना! नाहींतर एकदम उडी मारून माझं नरडं फोडायचा! नाहीं. हा घोरटोय. याला गाढ झोंप लागली आहे. टवा याला पकडायला ही नामी संधि हाय. वासुडेव बळवंट, शेवटीं गाफील अवस्थेंत तुला या बहाद्दर डॅनिअलनं पकडलं कीं नाय? (त्याच्या तरवारीवर बुटाचा पाय जोरानं ठेवून त्याच्या छातीवर बसतो. वासुदेव बळवंत एकदम जागा होतो.) आटा टूझी धडपड व्यर्थ हाय. (शिटी वाजवतो. विनायक जागा होऊन 'अरे हरामजाद्या' असं म्हणून डॅनिअलवर झडप घालतो. सोजीर येऊन त्याला पकडतात. 'अरे, टोपीवाला आला. पळा पळा' असं म्हणून इतर प्रवासी पळून जातात.) वासुडेव बळवंट, शेवटी टूला मी पकडलं की नाय?

वासुदेव : (संतापानं) मी बेसावध असतांना मला पकडलंस. पण हें खऱ्या शूराचं लक्षण नसून निव्वळ षंढाचं लक्षण आहे! यू कॉवर्ड!

डॅनिअल : सरळ हातीं न लागणाऱ्या शट्रूला, वाटेल त्या उपायानं नेस्टनाबूड करावं हीच खरी राजनीटी हाय! पकडा त्याला. जेरबंदानं जखडून टाका.

वासुदेव : तुझ्यांत कांहीं पौरुष असेल, तूं जर मेल्या आईच्या दुधावर

पोसला गेला नसशील, तर माझ्या हातीं तरवार देऊन माझ्याशीं सामना करशील. चल, माझ्या हातीं तरवार दे. माझं तुला आव्हान आहे.

डॅनिअल : टुझ्या हाटीं टरवार देण्याइटका हा डॅनिअल मूर्ख नाहीं.

वासुदेव : तापानं फणफणलेला आणि श्रमानं दमलेला हा वासुदेव बळवंत अशाही अवस्थेत तुझ्याबरोबर दोन हात करील आणि तरवारीच्या एकाच फटकान्यानं तुझी मुंडी छाटून या शांतमूर्ति बुद्धाच्या चरणीं वाहिली नाहीं, तर ब्राह्मणांची अवलाद सांगणार नाहीं !

डॅनिअल : हा दूसरा शिवाजी, 'इंडियन रिपब्लिक' स्थापन करणार होटा ! पण आटा टो फांसावर चढणार.

वासुदेव : आणि अमर होणार ! साहेब, तुम्हां गोन्यांना आत्म्याचं अमरत्व मान्य नसलं तरी आम्हां हिंदूंचा त्यावर पूर्ण विश्वास आहे. शिवाय साहेब, फांसाच्या दोरीचं भय किंवा खंत आम्हां देशभक्तांना कधींच वाटत नसते. कारण राष्ट्रासाठीं आत्मबलिदान करणाऱ्या हुतात्म्यांचे कंठ, पुष्पमालांनीं नव्हे, तर फांशीच्या दोरीनंच नेहमीं भूषविले जातात.

डॅनिअल : या बंडखोरानं चार दिवस देशांट कोण धुमाकूळ माजवला होटा ! जाहीरनामे काय काढलेन्; दरोडे काय घाटलेन; जाळपोळ काय केली; खुद्द गव्हर्नर साहेबांच्या मुंडक्यासाठीं इनामं काय लावलीन्! वासुडेव बळवंट, मिळालं कां टूला गव्हर्नरचं मुंडकं ? आटां टूझंच मुंडकं गव्हर्नर साहेबाकडे पाठवून डेटो !

वासुदेव : पिंजऱ्यांतल्या सिंहाला पोरंही खडे मारतात ! मला तुम्हीं खिजवलंत तर मला वाईट वाटणार नाहीं किंवा आश्चर्यही वाटणार नाहीं. कारण तुमच्यासारख्या गोऱ्या कातडीच्या, पण काळ्या अंतःकरणाच्या इंग्रजांचा तो शिरस्ताच आहे. झालं; माझं अवतारकार्य संपलं ! साहेब, या वासुदेव बळवंतानं बंडाचा खटाटोप केला, तो केवळ स्वताचं पोट जाळण्यासाठीं नाहीं. तर तुमची इंग्रजांची राजवट, म्हणजे केवळ पूतनामावशीचं वरकरणीं वात्सल्य आहे, याची जनतेला जाणीव करून द्यावी, आणि गरीब रयतेचं दैन्य व दारिद्र्य नाहींसं करण्याऐवजीं, त्यांचं रक्तशोषण करण्याची तुमची आसुरी लालसा, कोणत्या थराला गेली आहे, तें जगाचे निदर्शनास

आणावं, म्हणून होय. देशांतील अडाणी प्रजेला सावकारांनीं, आणि सुशिक्षितांना, वाघीणीचं दूध पाजून मेंढ्या बनवण्याचा सरकारनीं, जो पद्धतशीर पापी उद्योग चालवला आहे, तो बंद पाडण्यासाठींच, निरपेक्ष बुद्धीनं मीं बंडाचा झेंडा उभारला होता. माझ्या सकल देशबंधूंनो, ईश्वर साक्ष आहे, केवळ तुमच्या कल्याणासाठीं, या वासुदेव बळवंतानं सुखाच्या सरकारी नोकरीवर लाथ मारली; घरादारावर तुळशीपत्र ठेवलं; देवतासमान पत्नीला वनवास भोगायला लावला; आणि स्वतांच्या गळयाला फांसाची दोरी अडकवून घेतली! दुर्दैवानं त्याच्या तपश्चर्येला फळ आलं नाहीं म्हणून तुम्ही निराश अगर निरुत्साही होऊं नका. माझ्या राखेंतून फोनिक्स पक्षाप्रमाणें, असंख्य वासुदेव आणि विनायक निर्माण होतील, आणि टोपीवाल्याला देशांतून हुसकावून लावून तुमचे पांग फेडतील याची खात्री बाळगा! मात्र बंधूंनो, स्वातंत्र्याचा लाभ झाल्यावर, त्या स्वातंत्र्याच्या इमारतीच्या पायांत, माझ्यासारख्या अनेक हुतात्म्यांच्या हाडांचा खच पडलेला आहे, याचं स्मरण ठेवा. येतों, रामराम. डॅनिअल साहेब रामराम.

डॅनिअल : गुडनाइट! (सलाम करतो. पडदा पडतो.)

समाप्त